नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १८३ | शुक्रवार, दि. ०५ सप्टेंबर २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.
सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

## काँग्रेसकडून टॉफीवरही कर

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची विरोधकांवर टीका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली : स्वातंत्र्यानंतरचा आम्ही सर्वात मोठा निर्णय घेतला आहे. काँग्रेस मुलांच्या टॉफीवरही कर लावत असे. लोकांच्या घराचे बजेट उद्ध्वस्त झाले असल्याची टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर केली.**



वेळेवर बदल न करता, आपण आजच्या जागतिक परिस्थितीत आपल्या देशाला त्याचे योग्य स्थान देऊ शकत नाही. यावेळी १५ ऑगस्ट रोजी मी लाल किल्ल्यावरून म्हटले होते की, भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी पुढच्या पिढीतील सुधारणा करणे खूप महत्वाचे आहे. मी देशवासियांना वचन दिले होते की या दिवाळी आणि छठपूजेच्या आधी आनंदाचा दुहेरी वर्षाव होईल.

जीएसटीमध्ये पुढील पिढीसाठी आवश्यक सुधारणा करण्यात आल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. जीएसटी सुधारणांद्वारे भारताच्या गतिमान अर्थव्यवस्थेत पाच नवीन रत्ने (पंचरत्न) जोडली गेली आहेत. जीएसटी सुधारणांनंतर, भारतीयांचे राहणीमान सुधारेल, उपभोग आणि विकासाला एक नवीन बूस्टर डोस मिळेल. जीएसटी आणखी सोपा झाला आहे, नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून ५ टक्के आणि १८ टक्के असे नवीन दर लागू होतील.

पंतप्रधान मोदी म्हणाले, जीएसटी ही स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या आर्थिक सुधारणांपैकी एक आहे. एकीकडे, यामुळे देशातील सामान्य लोकांचे पैसे वाचत आहेत आणि दुसरीकडे, देशाची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे.

आठ वर्षांपूर्वी जेव्हा जीएसटी लागू झाला, तेव्हा अनेक दशकांचे स्वप्न पूर्ण झाले. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर ही चर्चा सुरू झाली. या चर्चा पूर्वीही होत असत, परंतु कधीही कोणतेही काम झाले नाही.

## आरक्षणाचा जीआर सरसकट नाहीच

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारने काढलेल्या जीआरविषयी वेगवेगळे मतमतांतरे व्यक्त केली जात असताना आता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा जीआर मराठा समाजाला आरक्षणाचा सरसकटचा लाभ देणारा नसल्याचे स्पष्ट केले आहे राज्य सरकारने मराठा आरक्षणाविषयी काढलेला जीआर सरसकटचा नाही. या प्रकरणी जे खरे कुणबी असतील त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळेल. या प्रकरणी कुणालाही खोटेपणा करता येणार नाही, असे ते म्हणाले.

मराठा आरक्षणाशी संबंधित सरकारने काढलेल्या जीआरवर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांनी हा जीआर दिशाभूल करणारा असल्याचा आरोप केला आहे. पण स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी या जीआरमुळे मराठवाड्यातील मराठ्यांचे भले झाल्याचा दावा केला आहे.

विशेषतः या प्रकरणी ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ नाराज झाल्याची चर्चा आहे. त्यांनी या प्रकरणी कॅबिनेटलाही दांडी मारली आहे. पत्रकारांनी गुरूवारी हा मुद्दा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे उपस्थित केला. त्यावर त्यांनी भुजबळ नाराज नसल्याचे नमूद करत सरकारचा जीआर सरसकट आरक्षण देणारा नसल्याचे स्पष्ट केले.

मुख्यमंत्री या मुद्यावर भाष्य करताना म्हणाले, छगन भुजबळ हे मंत्रिमंडळातून कुठेही निघून गेले नाहीत. त्यांची व माझी चर्चा झाली. मी त्यांना आश्वस्त केले आहे की, सरकारच्या जीआरमुळे ओबीसी समाजाला कोणताही धक्का बसणार नाही. हा सरसकट जीआर नाही. हा पुराव्याचाच जीआर आहे. फक्त मराठवाड्यात इंग्रजांचा राज्य नव्हते. तिथे निझामाचे पान ४



#### जीएसटी सुधारणांचेही केले स्वागत

केंद्र सरकारने जीएसटीमध्ये केलेल्या सुधारणांचेही स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्य जनतेवरील जीएसटीचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. देशाच्या इतिहासात असे फार कमी वेळा होते. अप्रत्यक्ष करांत इतक्या मोठ्या सुधारणा सामान्यतः होत नाही. पण मोदींनी ते केले. त्याला जीएसटी परिषदेने मान्यताही दिली. महाराष्ट्राने या सुधारणांचे समर्थन केले. त्याचा व्यापाराला मोठ्या प्रमाणात फायदा होईल. नवीन रोजगार निर्मिती होईल. लोकांवरील बोजा कमी होईल. अर्थव्यवस्थेला प्रचंड मोठी चालना मिळेल. मी दुसऱ्या पिढीच्या या सुधारणा लागू केल्याप्रकरणी पंतप्रधानांचे आभार मानतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## संमिश्र

### पश्चिम बंगाल विधानसभेत गोंधळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोलकाता** : गुरुवारी पश्चिम बंगाल विधानसभेत प्रचंड गोंधळ झाला. बंगाली स्थलांतरितांवर होणाऱ्या अत्याचारांबाबत सत्ताधारी पक्षाने आणलेल्या ठरावावर चर्चा सुरू होती. यावेळी विरोधी पक्षाने (भाजप) घोषणाबाजी केली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या प्रस्तावावर बोलणार होत्या. त्यानंतर भाजप आमदारांनी २ सप्टेंबर रोजी विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांच्या निलंबनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत घोषणाबाजी केली, ज्याला तृणमूल काँग्रेसच्या आमदारांनी विरोध केला.

### दिवाळीत विमान प्रवास ५२ टक्क्यांपर्यंत महागणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : तुम्हाला या दिवाळीच्या आठवड्यात तुमच्या नातेवाइकांना भेटायला जाण्यासाठी विमानाने जायचे असेल तर तुम्हाला १.५ पट जास्त खर्च करावा लागेल. १९ ते २५ ऑक्टोबर या कालावधीसाठी प्रमुख देशांतर्गत मार्गांवरील सरासरी इकॉनॉमी विमानभाडे गेल्या वर्षीच्या तुलनेत ५२% वाढले आहे. याचे कारण म्हणजे रुपया कमकुवत झाल्यामुळे वाढलेला खर्च आणि विमानांच्या कमतरतेमुळे नेटवर्क क्षमता कमी होणे. ट्रॅव्हल वेबसाइट इक्सिगोच्या आकडेवारीनुसार, या वर्षीच्या दिवाळी आठवड्यात मुंबई-पाटणा मार्गावरील सरासरी इकॉनॉमी भाडे १४,५४० रुपये आहे.




## मोदींकडून दिवाळी गोड करण्याचे कार्य

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून स्तुतिसुमने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : जीएसटी स्लॅब कपातीच्या निर्णयाचा विरोधक देखील फायदा घेणार आहेत, त्यामुळे टीका करताना विरोधकांना मोदीजींचे अभिनंदन करावेच लागेल. खऱ्या अर्थाने देशवासीयांची दिवाळी गोड आणि आनंदी करण्याचे काम प्रधानमंत्री मोदींनी केलेले आहे, त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो, असे स्तुतिसुमने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मोदी सरकारवर केले.

केंद्र सरकारने जीएसटीच्या स्लॅबमध्ये मोठा बदल केला आहे. मोदी सरकारने वस्तू आणि सेवा कराच्या दरात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार, आधीच्या चार स्लॅबपैकी १२ टक्के आणि २८ टक्के असे दोन स्लॅब रद्द करण्यात आले आहेत. आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच जीएसटी स्लॅब अस्तित्वात राहतील.

सरकारच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत असून राजकीय वर्तुळातूनही प्रतिक्रिया येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या निर्णयावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी विरोधकांना



टोला लगावताना, अमेरिकेच्या ट्रम्प टॅरिफला भारताने योग्य प्रत्युत्तर दिल्याचे म्हटले आहे.

तसेच, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देखील मोदीजींच्या मार्गदर्शनाखाली एक सकारात्मक पाऊल टाकलेलं आहे आणि जीएसटी कमी केलेला आहे. आता जे स्लॅब होते ५,१२,१८ आणि २८ आता फक्त ५ आणि १८ हे दोनच स्लॅब राहणार आहेत. त्यामुळे विमा पॉलिसीपासून जीवनाश्यक वस्तूंना केवळ ५ टक्के जीएसटी आहे, सर्व सामान्यांना लागणाऱ्या गरजा आणि वस्तूंवरील जीएसटी कमी केला आहे.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, दोनच स्लॅब ठेवल्यामुळे आज मोठ्या प्रमाणावर संपूर्ण देशवासीयांना दिलासा मिळालेला आहे, २८ टक्के शेवटचा स्लॅब होता, मधला १२ टक्के होता, आता दोनच स्लॅब ठेवल्यामुळे पान ४

## दाढ दुखणे थांबले असेल तर खाणाऱ्यांनी उत्तर द्यावे : आ. पवार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमधील कथित गँग्स ऑफ गद्दारच्या सिडको जमीन घोटाळ्याची सुप्रीम कोर्टाच्या उच्चाधिकार समितीने सिडकोचे अध्यक्षपद मिळताच सारे नियम धाब्यावर बसवून बिवलकर कुटुंबाला नवी मुंबईत १५ एकर जमीन दिली. हा ५ हजार कोटींचा भ्रष्टाचार आहे, असा आरोप रोहित पवार यांनी केला होता. या प्रकरणातील

दरम्यान, संजय शिरसाट यांनी या प्रकरणी आपल्यावरील आरोप फेटाळून लावले आहेत. प्रस्तुत प्रकरणात कोणतीही अनियमितता झाली नाही. सिडको (शहर व औद्योगिक विकास महामंडळ) या राज्य शासनाच्या नियोजन संस्थेचे निर्णय एका व्यक्तीकडून नव्हे तर संचालक मंडळाकडून सामूहिकपणे घेतले जातात, असेही आमदार रोहित पवार म्हणाले.

गंभीर दखल घेतली आहे. झोपलेल्या सरकारला आता तरी जाग येईल का? दाढ दुखणे थांबले असेल तर खाणाऱ्यांनी उत्तर द्यावे, असे प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दिली.

संजय शिरसाट यांनी भूखंड वाटपाची प्रक्रिया तात्काळ थांबवून सखोल चौकशी करावी, अशी मागणीही पवार यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांची भेट घेत केली होती.

आ. पवार यांनी काही दिवसांपूर्वी एक पत्रकार परिषद घेऊन आमदार संजय शिरसाट



यांच्यावर बिवलकर कुटुंबाला ५ हजार कोटींची जमीन आंदण म्हणून दिल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ माजली होती. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी गुरुवारी पुन्हा एकदा त्यांच्यासह महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, 'गँग्स ऑफ गद्दार'च्या सिडको जमीन घोटाळ्याच्या महापराक्रमाबाबत १२००० पानांचे पुरावे देऊनही या सरकारला जाग आली नाही, परंतु सर्वोच्च न्यायालयाद्वारे स्थापित उच्चाधिकार समितीने मात्र या प्रकरणाची गंभीर दखल घेतली.

वन विभागाची सरकारी जमीन असताना आणि सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना बिवलकर यांना बेकायदेशीरपणे भरपाई दिलीच कशी? असा प्रश्न उपस्थित उपस्थित करत याबाबत चौकशी करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवले आहे. या प्रकरणात पाठपुरावा करणाऱ्या सर्व सामाजिक राजकीय संघटना, स्थानिक नागरिक आणि भूमि पुत्रांच्या लढ्याचे हे यश आहे. झोपलेल्या सरकारला पान ४

## भुजबळांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा : राऊत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : छगन भुजबळ हे ओबीसीचे खरे नेते असतील तर त्यांनी आपला राजीनामा देऊन आपली नाराजी दाखवली पाहिजे. भुजबळ हे अजित पवारांच्या नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कृपेने महाराष्ट्राच्या

#### आंदोलकांची व्यवस्था करण्यात शिंदेंचे नाव

सरकारमधील काही घटक संघर्ष वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. मनोज जरांगे यांनी माघार घेऊच नये आणि फडणवीस यांचे सरकार अडचणीत यावे, अशी त्यांची इच्छा होती. सध्या महायुतीत कोणतीही स्ट्रॅटेजी नाही. त्यांनी या गोष्टी करू नये. ते आम्हाला तीनचाकी रिक्षा म्हणून हिनवत होते. आज ते ही तीनचाकी रिक्षाच आहेत. एकनाथ शिंदे यांना दूर ठेवण्यामागे काय स्ट्रॅटेजी होती. हे फडणवीसांना विचारले पाहिजे. कारण, इतके मोठे आंदोलक इथे आले. त्यांच्या गाड्या-घोड्यांची व्यवस्था करण्यात त्यांचेच नाव येत आहे. त्यांचा मुख्य उद्देश आरक्षण मिळवणे हा नव्हता, तर मुंबईत येऊन देवेंद्र फडणवीस यांचे समोर आव्हान उभे करणे हा होता, असेही खा. संजय राऊत म्हणाले.



मंत्रिमंडळात आहेत, असे मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी गुरूवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले आहे.

खा. संजय राऊत म्हणाले, मराठा आरक्षण हा सरकार व मनोज जरांगे पाटील यांच्यातील मुद्दा आहे. या चर्चेत विरोधी पक्षाला किंवा विरोधी पक्षांच्या नेत्यांना कुठेही सहभागी करून घेण्यात आले नाही. किंबहुना सरकारमधील जे प्रमुख घटक होते त्यांनाही घेतले नाही. वाशीला ज्यांनी गुलाल उधळला होता ते ही, मला शेवटच्या टप्प्यात चर्चेला दिसले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे आंदोलन, चर्चा, वाटाघाटी या फक्त भाजपच्या छत्राखाली होतील व याचे संपूर्ण श्रेय भाजपला मिळेल यासाठी अथक प्रयत्न केले व परिश्रम घेतले.

मनोज जरांगे पान ४

## मराठ्यांना आरक्षण मिळवूनच देणार

### मनोज जरांगे यांचा निर्धार; सातारा गॅझेटिअरवरून सरकारला दिला थेट इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी ओबीसी समाजासाठी सरकारने स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे स्वागत केले आहे. असे असले, तरी मराठ्यांना ओबीसीमध्ये समाविष्ट करून आरक्षण मिळवून देण्याची जबाबदारी

#### तुमचे रस्त्यावर फिरणे बंद करणार : जरांगे

पश्चिम महाराष्ट्रातील सातारा गॅझेटिअरमध्ये सरकारने हयगय करता कामा नये. महिने नाही, तर थोड्या दिवसात ते मंजूर झाले नाही, तर मी पुन्हा तुमचे रस्त्यावर फिरणे बंद करीन, असा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला.



आपलीच असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तसेच त्यांनी सरकारकडे विविध समाजासाठी उपसमित्या स्थापन करण्याची मागणी केली. कोणी कितीही उपसमित्या केल्या, माझ्याबाबत अफवा पसरवल्या, तरी मराठ्यांना आरक्षण मीच मिळवून देणार, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. ते काल छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

मनोज जरांगे म्हणाले, ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली, पान ४

## पंजाब-हरियाणामध्ये पूर

### ४८ जणांचा मृत्यू; दिल्लीत पाणी; उड्डाणपूल खचला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : पंजाब मधील सर्व २३ जिल्हे पूरग्रस्त आहेत. १,६५५ गावांमधील ३.५५ लाखांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या सुट्ट्या ३ सप्टेंबर ते ७ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आल्या आहेत. १ ऑगस्ट ते ३ सप्टेंबरपर्यंत आलेल्या पुरात ३७ लोकांचा मृत्यू झाला आहे. पठाणकोटमध्ये ३ लोक बेपत्ता आहेत.



पंजाबच्या सीमेला लागून असलेल्या हरियाणातील अनेक भागही पुराच्या विळख्यात सापडले आहेत. राज्यात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. हिसार, पंचकुला, अंबाला आणि रोहतकमधील सर्व शाळा पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात आल्या आहेत. दिल्लीतून पाणी सोडण्यात आल्यामुळे फरिदाबादमध्ये यमुना नदीने धोक्याची पातळी गाठली आहे.

दिल्लीतील यमुनेचे पाणी आता शहरात येऊ पान ४

## तुम्ही पुढचे ४० वर्षे जमिनीवरच राहणार

### डॉ. सुजय विखे पाटील यांचा बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता टोला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माणसाने कधीही हवेत जाऊ नये. कारण हवेत गेल्यावर जमीन दिसायची बंद होते आणि जमिनीवरच मतदार असतात, असे सांगून तुम्ही हवेतच राहिले आणि खाली लोकांनी

ज्या मराठा आरक्षणामुळे लोकसभेमध्ये पूर्ण राजकारण झालं आणि त्याचा फटका मला बसला, आज त्याच मराठा आरक्षणाची सोडवणूक करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राधाकृष्ण विखे पाटलांवर दिली. विखे पाटलांना या समितीचे अध्यक्ष केलं. कोणी जायला तयार नव्हतं, ज्या ठिकाणी जायला पुढारी घाबरत होते, तेथे विखे पाटील मोकळ्या मनाने गेले, मराठ्यांना आधार दिला. त्यावेळी संगमनेरचे काही लोक खुश झाले की, आता हे कसे फसतील. अनेक लोक देव पाण्यात ठेवून बसले होते, कसं का होईना? हे विखे पाटलांच्या हातून घडता कामा नये. कसे विखे पाटील यात अडकतील मात्र परमेश्वराची पुण्याई, परमेश्वराच्या प्रति आपली भक्ती, गरिबांचा आशीर्वाद आणि ४० वर्षाच्या कौटुंबिक त्यागाचा परिणाम होता. त्यामुळे उपोषण सोडवतांनी जरांगे पाटील यांनीही उपोषणाचे श्रेय मुख्यमंत्र्यांचे तर आहेच, पण मुख्यमंत्र्यानंतर विखे पाटलांना याचे श्रेय जाते, असेही जरांगे पाटील त्यावेळी म्हणाले आहे.
– **डॉ. सुजय विखे पाटील**



कार्यक्रम लावून टाकला. ज्यांना काहीही राजकीय अस्तित्व नाही असा माणूस आपण गोरगरीब व सामान्य माणसाच्या ताकदीवर संगमनेरचा आमदार करून दाखवला ही गोरगरीब जनतेची ताकद आहे. आपण ४० वर्ष जमिनीवर होतो आणि पुढचे चाळीस वर्षे देखील तुमच्या आशीर्वादाने जमिनीवरच राहणार असल्याचे प्रतिपादन माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. पान ४

# बाजारात स्वच्छतागृहासह पोलीस चौकीचा अभाव

## भाजप व्यापारी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारतीय जनता पक्षामध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले भाजप व्यापारी आघाडीच्या वतीने कापड बाजार, नवीपेठ भागात व बाजारात महिला व पुरुष स्वच्छतागृहाचा अभाव,गंजबाजार पोलीस चौकी सुरू करण्यासाठी वर्षभरापूर्वी निवेदन देऊनही सुरू होत नाही, कापड बाजारात व इतर ठिकाणी व्यापाऱ्यांना समाजकंटकांचा होणारा त्रास त्रास तर मनापाचे गाळ्याचे भाडे कमी करावे, असे निवेदन पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत देण्यात आले.



> भाजपाचे पदाधिकारीही शहरातील व्यापारी वर्गाच्या मागे उभे राहून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यापारी वर्गाला कोणताही त्रास होता कामा नव्हे, यासाठी उपाययोजना राबवा, असे मनपा आयुक्तांना सांगितले आहे. व्यापारी आघाडीने केलेल्या कामाची दखल पक्ष नक्कीच घेईल.
> **– अनिल मोहिते**

तर मनापाने गाळेधारक व्यापाऱ्यांना नोटिसा काढल्या आदी विषयावरभारतीय जनता पक्ष व्यापारी आघाडीच्या वतीने भाजपा व्यापारी आघाडीचे मध्य मंडल अध्यक्ष प्रशांत बुऱ्हाडे यांनी पदाधिकाऱ्यांसमोर खंत व्यक्त केली व पक्ष व्यापारी आघाडीच्या पाठीशी उभा राहावा, असे आवाहन त्यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या शहर व्यापारी आघाडीच्या नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र अनिल मोहिते यांच्या हस्ते देण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सुनील रामदासी सरचिटणीस महेश नामदे, निखिल वारे, प्रदेश सदस्या गीता गिल्डा, महेंद्र गंधे, वसंत लोढा, गोपाल वर्मा, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळेसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गणेशोत्सवातून संस्कृती जपण्याचे कार्य

## आ. संग्राम जगताप; नगरमध्ये 'ए लाव रे तो डीजे', लाईव्ह देखाव्याचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** गणेश उत्सवाच्या माध्यमातून आपली संस्कृती, परंपरा, धार्मिकता, एकात्मता व आपला इतिहास जोपासण्याचे कार्य होत असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

नगर शहरातील जुना बाजार येथील जय हिंद तरुण मंडळाच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त 'ए लाव रे तो डीजे' या विशेष लाईव्ह देखाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची सुरुवात केली. मात्र सध्याच्या काळात उत्सवांमध्ये पारंपरिक वाद्य बाजूला पडून डीजे सिस्टीमचा सर्रासपणे वापर होताना दिसतो.



या कर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषण तर होतेच, पण नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. यामुळे काही ठिकाणी दुर्दैवी मृत्यूंची उदाहरणेही समोर येत आहेत.

देखाव्याच्या माध्यमातून डीजे सिस्टीममुळे नागरिकांना आणि युवकांना कोणत्या प्रकारचा त्रास होतो याचे जिवंत चित्रण सादर करून समाजामध्ये जनजागृती करण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. युवकांनी डीजे सिस्टिमपासून दूर राहून आपल्या पारंपरिक वाद्यांकडे वळावे, असे आवाहन मंडळाकडून करण्यात आले.

यावेळी सागर बेग, माजी नगरसेवक विपुल शेटीया, माजी सभापती अविनाश घुले, मनेष साठे, बाली ठाकूर, उमेश राठोड, गणेश होनवाळे, रुपेश चेंगडिया, प्रशांत मुथा, निखिल शेटीया, अनिकेत कौर, अमोल ठाकूर, योगेश ढुबे, संभाजी पवार, विशाल पवार, भरत पवार, प्रतीक चोरडिया, आशिष पोखरणा आदी मान्यवरांसह गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> जय हिंद तरुण मंडळाने गणेश उत्सवानिमित्त लाईव्ह देखाव्याची संकल्पना अहिल्यानगर शहरात सर्वप्रथम आणली. कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत विविध सामाजिक विषयांवर जनजागृती करण्याचे हे कार्य अत्यंत उपयुक्त आहे. दिवसेंदिवस आपली संस्कृती व परंपरा लोप पावत असल्याने तिचे जतन होण्यासाठी प्रबोधनाची खरी गरज आहे.
> **– विपुल शेटीया,** माजी नगरसेवक

> जय हिंद तरुण मंडळाच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त दरवर्षी विविध विषयांवर समाजामध्ये जनजागृती केली जाते. वृक्षारोपण व संवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता, आरोग्य, व्यसनमुक्ती आदी विषयांवर विद्यार्थ्यांमार्फत लाईव्ह देखावे सादर करून प्रबोधन केले जाते. ही बाब कौतुकास्पद आहे.
> **– संग्राम जगताप, आमदार**

# माध्यमिक शिक्षक सोसायटीकडून विराजचा सन्मान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने विराज बाबासाहेब बोडखे याचा जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून विभागीय स्तरासाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

> माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या माध्यमातून संचालक व सभासदांच्या पाल्यांना नेहमीच प्रोत्साहन दिले जाते. आमची सोसायटी ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित नसून सामाजिक, क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विराज बोडखे याने सुवर्णपदक मिळवून शहराचे नाव उंचावले आहे.
> **– आप्पासाहेब शिंदे, चेअरमन**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष व सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे यांचे लहान चिरंजीव असलेले विराज बोडखे याने नुकत्याच जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व महापालिका क्रीडा विभाग यांच्या वतीने झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत १७ वर्षाखालील गटात दमदार खेळाचे प्रदर्शन करून सुवर्णपदक पटकाविले. या यशामुळे त्याने शहराचे नाव कुस्ती क्षेत्रात उंचावले असून, पुढे विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेत विराज नक्कीच चमकेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. माध्यमिक शिक्षक सोसायटीत झालेल्या कार्यक्रमात चेअरमन आप्पासाहेब शिंदे व व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके यांनी विराज बोडखे याचा सत्कार केला.

यावेळी सुनील दानवे, उमेश गुंजाळ, महेंद्र हिंगे, बाबासाहेब बोडखे, राजेंद्र कोतकर, सुधीर कानवडे, संभाजी गाडे, किशोर धुमाळ, आप्पासाहेब जगताप, बालाजी गायकवाड, छबु फुंदे, साहेबराव रक्टे, शिवाजी लवांडे, बाजीराव अनभुले, अतुल कोताडे, विजय पठारे, सुरज घाटविसावे, संचालिका वर्षा खिलारी, वैशाली दारकुंडे, तज्ञ संचालक उद्धव सोनवणे, सचिन जाधव, सचिव स्वप्निल इथापे, ज्ञानेश्वर लबडे, दिपक आमटे, संतोष दहातोंडे, निखील हिरनवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# १०० जोडप्यांच्या हस्ते गणपतीची महाआरती

## जिल्हा पोलिस अधिक्षकांसह उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील प्रसिद्ध व जुने मंडळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सम्राट तरुण मंडळ ट्रस्टने यंदा शंभरी पूर्ण केली आहे. शतक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात १०० जोडप्यांच्या हस्ते गणपती महाआरतीचा थाटामाटात सोहळा पार पडला.

भिंगार कॅम्प येथील विशाल गणपती मंदिर प्रांगण भक्तांच्या गर्दीने फुलून गेले होते. सकाळपासूनच भक्तांच्या उपस्थितीत धार्मिक वातावरण निर्माण झाले. संपूर्ण मंडळाने १०० वर्षांचा प्रवास गाजावाजा न करता भक्तिमय उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्धार केला



असून त्याचाच एक भाग म्हणून हा अनोखा उपक्रम पार पडला.

कार्यक्रमाला जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी श्रींच्या चरणी नमस्कार करून महाआरतीत सहभागी होत भक्तांना शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे शहरातील उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनीही महाआरतीत सहभाग घेतला. तसेच भिंगार कॅम्प सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर, प्रमोद लहारे, गव्हाणे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्रींची आरती होताच सभोवताली शेकडो भाविकांच्या आवाजात 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष घुमला.

याप्रसंगी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाआरतीनंतर सामाजिक बांधिलकी जपत मंडळाने विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प केला. १०० वर्षांच्या प्रवासात मंडळाने केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही योगदान दिल्याची आठवण करण्यात आली.

# 'शिवमित्र'च्या गणेशोत्सवात आमटी-भाकरीचा प्रसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील गांजेगल्ली, -गंजबाजार, अहिल्यानगर मधील शिवमित्र प्रतिष्ठानने काल सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी हि सत्यनारायण महापूजा आयोजित केली होती. त्यानिमित्त सर्वासाठी आगडगाव येथील सुप्रसिद्ध आमटी-भाकरी, ठेचा, शिरा या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा लाभ सुमारे ३००० भाविकांनी घेतला.

यावेळी मंडळाचे मंडळाचे अध्यक्ष संकेत गुरव व सर्व पदाधिकारी व मित्र परिवार तसेच मंडळाचे सल्लागार प्रशांत मुथा, भाजपाचे उपाध्यक्ष गोपाल वर्मा, चेतन कांकरिया, प्रणय दळवी, प्रकाश मुथा, अभय बोरा, सुभाष आनिचा, सागर गुरव, गणेश कांकरिया आदी उपस्थित होते.

# रोटी व्यवहार ते बेटी व्यवहाराची क्रांती अजून बाकी : ॲड. गवळी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्राच्या इतिहासात मराठा समाजाला कुणबी दर्जा देऊन ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळवून देण्यात आंदोलक मनोज जरांगे आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी निर्णायक यश संपादन केले. हा रोटी व्यवहाराचा विजय, लोकशाहीच्या चौकटीत मिळवलेला आर्थिक न्यायाचा नवा टप्पा आहे. मात्र हा विजय अंतिम नाही, तर खरी क्रांती अजून बाकी असून, ती बेटी व्यवहार रुपाने साध्य होणार असल्याची भावना फिनिक्स हेल्पलाइनचे ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली आहे.

ते पुढे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिभेद निर्मूलनासाठी संविधान, कायदे व आरक्षणाचा मार्ग दाखवला. पण समाजातील जातीय प्रवृत्ती बदलताना दिसत नाही. जात नष्ट करायची असेल, तर रक्ताचे नातेसंबंध जोडावे लागतात आणि ते फक्त आंतरजातीय विवाहातून शक्य होणार आहे. अखिल ओबीसी समाजाने आता सगे-सोयरे तत्त्वज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. आपण सगळे ओबीसी समाजातील लोक एकमेकांचे नातेवाईक आहोत, तर मग मुलामुलींचे विवाह समाजातील विविध जातींमध्ये का होऊ नये, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे

> आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन द्या, त्यासाठी कायदेशीर-सामाजिक संरक्षण द्या आणि सगे-सोयरे क्रांतीची मशाल पेटवा. अन्यथा हा विजय फक्त राजकीय स्वार्थासाठी मर्यादित ठरेल आणि भविष्यात लोक त्याला शकुनीपण म्हणून हिणवतील. परंतु बेटी व्यवहाराकडे धाडसी पाऊल टाकले, तर खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचे वारस, समाजशिल्पकार व क्रांतिकारक नेते म्हणून इतिहासात नोंद होणार आहे.
> **– ॲड. कारभारी गवळी**

# कोठी परिसरात मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ

## महानगरपालिकेला आठ दिवसांचा अल्टीमेटम : स्वप्निल शिंदे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** कोठी परिसरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर होत असून नागरिकांना दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याच परिसरातील सारसनगर भागातील गंगुबाई फुलारे या रस्त्याने जात असताना मोकाट कुत्र्याने त्यांच्या पायाला चावा घेतला.



या घटनेत त्या जखमी झाल्या असून त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना घडताच कोठी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे यांनी तत्परता दाखवत जखमी महिलेला उपचारासाठी नेले. त्यांनी महानगरपालिकेकडे तातडीने मागणी केली की, शहरात वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या त्रासावर नियंत्रण आणण्यासाठी तातडीने कारवाई करण्यात यावी.

शहरातील अनेक भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचा उच्छाद वाढला असून, शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक यांना रोज त्रास सहन करावा लागत आहे. तरीही महानगरपालिकेकडून ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

> पुढील आठ दिवसांत महानगरपालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त केला नाही, तर आम्हाला महापालिकेत कुत्रे सोडून आंदोलन करावे लागेल. दरम्यान, नागरिकांनी देखील प्रशासनाने कुत्र्यांच्या लसीकरणासोबतच त्यांना आश्रयगृहात नेण्याची कार्यवाही तातडीने हाती घ्यावी.
> **– स्वप्निल शिंदे**

# बुऱ्हानगरमध्ये गौरी गणपतीचे उत्साहात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** गणेश उत्सवामध्ये गौरी गणपती आगमनाला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. बुऱ्हानगर येथील अनुपमा शेखर देशपांडे यांच्या घरी यंदा गौरी गणपतींचे पारंपरिक विधीपूर्वक आणि उत्साहात स्वागत करण्यात आले. गौरी गणपतीच्या स्वागतावेळी धार्मिक भुसावळ काढून महिलांनी मंगल गीतांच्या गजरात वातावरण दुमदुमले.

यावेळी पारंपरिक पद्धतीनुसार गौरी गणपतींची स्थापना करून विधिवत पूजा, महाआरती व विविध भाज्यांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. घरभर फुलांच्या माळा, रंगीत पडदे, पारंपरिक दिवे आणि रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती. या आकर्षक सजावटीमुळे घरात आध्यात्मिक आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले. महिलांनी केलेल्या सर्जनशील सजावटीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

गौरी पूजनात महिलांचा विशेष सहभाग दिसून आला. नैवेद्य अर्पण, भजने, आरत्या आणि सजावटीतून महिलांनी परंपरेला उजाळा दिला. अनुपमा देशपांडे यांच्यासह अपूर्वा देशपांडे यांनी देखील सजावटीत विशेष मदत केली. गणेश उत्सव आणि गौरी पूजनामुळे नातेवाईक, शेजारी व बांधव यांच्यात बंधुभाव वृद्धिंगत होतो. कौटुंबिक परंपरेतून येणाऱ्या अशा धार्मिक कार्यक्रमामुळे समाजात एकतेचा व सामंजस्याचा संदेश दिला जातो, असे यावेळी उपस्थित महिलांनी सांगितले.

# गणरायाला दिला भक्तिमय वातावरणात निरोप

## ढोल-ताशांच्या गजरात रंगली मिरवणूक; सर्वधर्मीय कामगारांचे एकात्मतेचे दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** एमआयडीसी परिसरात गेल्या सात दिवसांपासून सुरु असलेला गणेशोत्सव मंगलमय वातावरणात पार पडला. स्वराज्य कामगार संघटनेच्या पुढाकाराने एक्साईड कंपनीत स्थापन करण्यात आलेल्या श्री गणेशाची विसर्जन मिरवणूक मंगळवारी पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषमय वातावरणात काढण्यात आली.



कामगारांनी उत्साहात ठेका धरत गणरायाला निरोप दिला. विशेष म्हणजे या मिरवणुकीत सर्व धर्मीय कामगार एकत्र येत धार्मिक सौहार्दाचे आणि एकात्मतेचे दर्शन घडविले.

गणेशोत्सवाच्या सात दिवसांत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सत्यनारायण महापूजेनंतर मिरवणुकीला प्रारंभ झाला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात महिला वर्गाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत सोहळ्याची शोभा वाढविली.

गणेश विसर्जन सोहळ्यास संदीप मुनोत, योगेश गलांडे, दत्ता तापकिरे, हेमा शेळके, मनीषा झावरे, पोलीस निरीक्षक विनोद परदेशी, उमेश शेरकर, सचिन हरदास यांच्यासह कंपनीतील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मिरवणुकीदरम्यान पारंपरिक ढोल-ताशांच्या निनादात, गुलालाच्या उधळणीत व गाण्यांच्या तालावर कामगारांनी ठेका धरला. अभिजित सांबारे, रमेश शिंदे, स्वप्नील खराडे, संतोष शेवाळे, अजिनाथ शिरसाठ, राहुल जगधने, वसीम शेख, फिरोज शेख, सचिन खेसे, किसन तरटे, रमेश देशमुख, दिपक परभणे, सोमनाथ शिंदे आदींसह शेकडो कामगारांनी मिरवणुकीत उत्साहात सहभाग नोंदविला.

# विनायकराज प्रतिष्ठान वाखुरेंच्या योगदानामुळे अग्रस्थानी

## सभापती राम शिंदे; सावेडीत ना. शिंदेंच्या हस्ते गणेशाची आरती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सावेडीतील गुलमोहर रोडवर मानाचा उपनगराचा पहिला गणपती म्हणून ओळखले जाणारे विनायकराज प्रतिष्ठान यावर्षी १८ व्या वर्षात पदार्पण करत आहे. परिसरातील गणेशभक्तांसाठी ही संस्था एक वेगळीच ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. विनायकराज प्रतिष्ठान वाखुरे बंधूंच्या योगदानामुळे उपनगरात अग्रस्थानी आहे, असे प्रतिपादन विधानसभेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.



> **वाखुरे बंधूंमुळे प्रतिष्ठान नावलौकिक**
> ना. शिंदे यांच्या उपस्थितीमुळे वाखुरे बंधूंच्या कार्याचा गौरव झाला असून गेल्या १८ वर्षांत विपुल वाखुरे आणि विनय वाखुरे यांच्या पुढाकाराने विनायकराज प्रतिष्ठान हा केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरला आहे. सावेडीतील मानाचा गणपती आज वाखुरे बंधूंच्या नावाने ओळखला जातो, हेच या प्रतिष्ठानचे मोठे यश मानले जात आहे.

गणरायाच्या आरतीवेळी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे उपस्थित राहिले. त्यावेळी ते बोलत होते.

प्रा. शिंदे पुढे म्हणाले की, या प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विपुल वाखुरे आणि उपाध्यक्ष विनय वाखुरे हे गेली अनेक वर्षे गणेशोत्सवा सोबतच सामाजिक उपक्रमांमध्येही आघाडीवर आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रतिष्ठानने केवळ उत्सव साजरा न करता समाजाला दिशा देणारे अनेक कार्यक्रम राबवले आहेत.

# विकासाच्या बाबतीत शहर अव्वल करणार

## आ. आशुतोष काळे; ८७ लाखांच्या विकास कामांचे भूमिपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहराला पुन्हा विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे, हे माझं प्रमुख उद्दिष्ट आहे. नगरपरिषद, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयानेच शहराचा खऱ्या अर्थाने विकास होणार असून येत्या काळात आणखी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणून कोपरगाव शहर विकासाच्या बाबतीत अव्वल करायचे आहे असे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले आहे.

कोपरगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या आ.काळे यांच्या पाठपुराव्यातून दीर्घ काळापासून प्रतीक्षेत असलेल्या विविध नागरी सुविधांच्या कामांना गती मिळाली असून कोपरगाव शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत विविध प्रभागात ८७ लाखांच्या विकासकामांचा भूमिपूजन समारंभ नुकताच आ. काळे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

आ. काळे पुढे म्हणाले की, शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज आणि इतर नागरी मूलभूत सुविधांच्या उभारणीसाठी सर्व विकासकामांना गती देणार आहे. शहरातील बहुतांश मुख्य रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत परंतु प्रत्येक प्रभागातील रस्त्यांची कामे पूर्ण करायची आहेत. त्या अनुषंगाने ही कामे हाती घेण्यात आली आहेत. कामे पूर्ण झाल्यानंतर नागरीकांच्या कित्येक वर्षापासूनच्या अडचणी कायमच्या दूर होणार आहेत.



### नागरिकांच्या अडचणी दूर करणार

शहराच्या विकासाला गती देण्याचा माझा संकल्प आहे. मागील काही वर्षांपासून पाणी प्रश्नाप्रमाणे प्रलंबित असलेली अनेक महत्वाची कामे यापुढील काळात निश्चितपणे मार्गी लागणार आहे. नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकासकामे सुरू आहेत. नागरी सुविधा सक्षम करून शहरवासीयांचा जीवनमान उंचावणे, हीच माझी प्राथमिकता असून ही विकासकामे पूर्ण झाल्यानंतर कोपरगाव शहराचा चेहरामोहरा बदलणार आहे असा विश्वास आ. आशुतोष काळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# निमगाव वाघात मराठा समाजाचा जल्लोष

## शासन निर्णय काढल्याने पेढे वाटून आनंदोत्सव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसंदर्भात मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचे चार दिवस चाललेले उपोषण यशस्वी झाले. राज्य सरकारने मागण्यांना मान्यता देऊन जीआर काढल्यानंतर संपूर्ण राज्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर निमगाव वाघा (ता. नगर) येथे मराठा समाज बांधवांनी जल्लोष केला.

फटाक्यांची आतषबाजीत एकमेकांना पेढे भरवून एक मराठा लाख मराठा! च्या घोषणा देऊन जल्लोष करण्यात आला. या आनंदोत्सवात केवळ मराठा समाजच नव्हे तर इतर समाजबांधव देखील सहभागी झाले होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे, गोकुळ जाधव, भाऊसाहेब जाधव, नवनाथ जाधव, वैभव पवार, मयूर काळे, किरण ठाणगे, बापू शिंदे, पप्पू भुसारे, संदीप डोंगरे, बाळासाहेब जाधव, शिवाजी जाधव, बाळू फलके आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### संघर्षाला मिळाले यशः डोंगरे

नाना डोंगरे म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या अनेक दिवसांपासून समाजाच्या न्याय्य हक्कासाठी केलेल्या संघर्षाला यश मिळाले आहे. सरकारने आमच्या मागण्यांची दखल घेत जीआर काढला ही ऐतिहासिक घटना आहे. हा विजय केवळ मराठा समाजाचा नसून, संपूर्ण मराठा समाजातील शेतकरी, ग्रामीण व सामान्य जनतेच्या संघर्षाचा विजय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# बस थांब्याबाबत ‘मनसे’ला यश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पाठपुराव्याला यश आले असून साईबाबा कॉर्नर व बेट नाका या ठिकाणी एसटीचे अधिकृत थांबे झालेले आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कोपरगाव बस आगाराच्या हद्दीत येणाऱ्या साईबाबा कॉर्नर व बेट नाका या ठिकाणी बस थांबा मिळावा, यासाठी कोपरगाव येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सतीश अण्णा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगावचे आगार व्यवस्थापक अमोल बनकर यांना बस थांबा मिळावा व तेथे बोर्ड लावण्यात यावा त्या अनुषंगाने निवेदन देण्यात आले होते.

सदर ठिकाणी त्वरित महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कोपरगाव आगाराच्यावतीने साईबाबा कॉर्नर व बेट नाका येथे फलक लावले असून या विनंती फलक थांब्याचे पूजन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सतीश अण्णा काकडे तसेच आगाराचे व्यवस्थापक अमोल बनकर, मनसेचे पदाधिकारी बापू काकडे, अनिल गाडे, बाळासाहेब खैरनार, रवींद्र झावरे, प्रमोद आरण, अबजत सय्यद, भैय्या सुपेकर आदींच्या उपस्थिती करण्यात आले.

# समर्थ विद्यालयाचे कबड्डी स्पर्धेत यश !

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** समर्थ विद्यालयाच्या कबड्डी संघाने १७ व १९ वर्ष गटामध्ये यश मिळविले आहे. त्यांचे कौतुक होत आहे.

महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व कर्जत तालुका क्रीडा समिती यांच्यावतीने आयोजित तालुकास्तरीय मुलांच्या कबड्डी स्पर्धे चे आयोजन समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कर्जत येथे करण्यात आले होते. ६५ विद्यालयांतील ७१५ खेळाडूंचा या स्पर्धेमध्ये सहभाग.

उद्घाटन समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी, गटशिक्षणाधिकारी प्रदीप चव्हाण,



तालुका कर्जत क्रीडा अधिकारी श्रीमती प्रियंका खिंडरे, समाज प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष नामदेवराव राऊत, समाज प्रबोधन संस्थेच्या निरीक्षिका उषा राऊत, बाळासाहेब साळुंखे, सुभाषचंद्र तनपुरे, अशोक खेडकर, दत्तात्रय नेवसे, विजूकाका तोरडमल, अक्षय राऊत तसेच माजी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सतरा वर्षे वयोगटाचा अंतिम सामना समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कर्जत व श्री विठ्ठल विद्यालय, माहिजळगाव या दोन संघांमध्ये झाला. यामध्ये समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कर्जत या विद्यालयाचा संघ अंतिम विजेता ठरला. या सामन्याचे पंच म्हणून किशोर पवार, अजित वडवकर, भरत तांबे, दिलीप लोंढे यांनी काम पाहिले.

१९ वर्षे वयोगटाचा अंतिम सामना समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कर्जत व पद्मभूषण वसंतदादा पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंबिकानगर या दोन संघांमध्ये झाला. यामध्ये समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कर्जतचा संघ अंतिम विजेता ठरला. या सामन्याचे पंच म्हणून दादा गदादे, भरत तांबे, किशोर पवार व अमित तोरडमल यांनी काम पाहिले.

# दत्तनगर महिला मंडळ गणेशोत्सवाची आरती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील दत्तनगर महिला गणेशोत्सव मंडळाच्यावतीने भाजपाचे नेते आणि पंचायत समितीचे माजी सभापती दिपक पटारे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. याप्रसंगी त्यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी रामभाऊ जगताप, आसिफ पोपटिया, साजिद शेख, भिमा बागुल, किरण रक्टे, शरद भणगे, अण्णासाहेब देशमुख, आकाश पवार, भाऊसाहेब गुंड, राजू भणगे, संतोष देशमुख, समर्थ देशमुख, सचिन कुंभार, पप्पू म्हस्के, मयूर सोनवणे, राजेश माने, गणेश पटाट, सुहास पवार, शाम सोनावणे, किरण गवारे, सुनिल देशमुख, सुजित अहुजा. महिला मोर्चाच्या वैशाली पवार, अर्चना पवार, वैशाली देशमुख, रुपाली बागुल, निकिता पवार, कोमल गवारे, रेणुका कुंभार, मंदाकिनी पवार, मीना धनक, मनीषा गुंड, उज्वला भणगे, शोभा समोसे, निशा देशमुख, सुरेखा गुंड, शकुंतला गुंड, गीता आत्या, जना बाई कुंभार, मंगल देशमुख आदी उपस्थित होते.

# महिलेवर कोयत्याने हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** दूध आणण्यासाठी जाणाऱ्या महिलेला रस्त्यात आडवून कोयत्याने हल्ला चढविला असल्याची घटना राहुरी तालुक्यातील टाकळीमिया या ठिकाणी घडली. या हल्ल्यात नंदिनी शिंदे हि महिला जखमी झालेली आहे. या प्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. नंदिनी अमोल शिंदे ह्या राहुरी तालुक्यातील शिंदे वस्ती, टाकळीमियॉ, येथे राहत असून त्यांच्या शे-जारी परिघाबाई कौशीनाथ शिंदे हे त्यांच्या कुंटुबासह राहवयास आहे. याच्यासोबत नेहमी वाद होत असतात. त्या बाबत नंदिनी शिंदे यांनी १ सप्टेंबर रोजी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजेचे सुमारास नंदिनी शिंदे ह्या दुध आणण्यासाठी जात होत्या. तेव्हा आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवले व डोक्यात कोयता मारुन त्यांना जखमी केले. तसेच त्यांच्या कुटुंबातील इतर लोकांना बांबू, बॅट व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली.

# नशेखोराने दारूसाठी पत्नीला पेटविले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** नशेखोर पतीच्या क्रूर कृत्याची शहरात सलग तिसरी घटना घडली आहे. आंबेडकरनगरमध्ये नशेसाठी पैसे देत नसल्याच्या कारणावरून पतीने झोपेतून उठत पत्नीवर सुलोचनची कॅन रिकामी करत पेटवून दिले. मंगळवारी सायंकाळी आंबेडकरनगरमध्ये घडलेल्या या घटनेत विवाहिता गंभीररीत्या भाजली असून तिच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सरवर शहा मुसा शहा (४२) असे पतीचे नाव असून त्याची पत्नी इम्तियाज बी (४०) यात गंभीर भाजल्या गेल्या. प्लंबिंगचे काम करणारा सरवर नशेच्या आहारी गेला आहे. त्यातून तो सातत्याने आरोपी सरवर शहा मुसा शहा पत्नीला मारहाण करीत होता. २ सप्टेंबर रोजी इम्तियाज दुपारी कामानिमित्त बाहेर गेल्या होत्या. सायंकाळी त्या घरी परतल्या. तेव्हा सरवर घरातच झोपलेला होता. पत्नी आल्याचे कळताच त्याने उठून दारू पिण्यासाठी पैसे मागत वाद घालण्यास सुरुवात केली.

पत्नीने त्याला पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. त्याने मोठमोठ्याने शिवीगाळ करून मारहाण केली. पत्नीने स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तेवढ्यात त्याने प्लंबिंगच्या कामासाठी घरात ठेवलेला सुलोशनचा डबा त्यांच्या शरीरावर ओतून पेटवून दिले.

# उभ्या ट्रकला धडक; दुचाकीस्वार ठार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील लिहाखेडी येथे उभ्या रस्त्यावर असलेल्या आयशर ट्रकला मागून जोरदार धडक देणाऱ्या दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना लिहाखेडी शिवारात मंगळवारी रात्री १० वाजेच्या सुमारास झाली. कृष्णा लक्ष्मण फरकाडे (वय ४४) असे मयताचे नाव असून ते लिहाखेडीचे माजी ग्रामपंचायत सदस्य होते.मंगळवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास दुचाकीने (एमएच २० एचएफ ९३५९) सिल्लोड -अजिंठा रस्त्यावरून गोळेगावहून लिहाखेडीला येत होते. ते लिहाखेडी शिवारात आले असता रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या आयशर ट्रकला मागून धडकले. यानंतर गावकऱ्यांनी त्यांना तत्काळ सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले

# शेत रस्ते सीमांकनाबाबत जनजागृती; पाचेगावात ग्रामसभा घेणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** गाव नकाशाप्रमाणे असलेले शेतीचे रस्ते, गावशिवरस्ते अतिक्रमणमुक्त करणे व मोफत मोजणी करून खुले करणे तसेच शासनाच्या मदतीने रस्ते पक्के बनविणे व पाचेगाव नेवासा तालुक्यातील पहिले अद्ययावत शेत रस्ते सीमांकन व रस्त्यांना क्रमांक देणेबाबत मॉडर्न रोड मॉडेल व्हिलेज बनविण्याचा ठराव करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. शेत रस्त्यांची यादी करण्यासाठी गाव शिवार फेरी कार्यक्रम आयोजित करून विशेष ग्रामसभेत एकमताने ठराव मंजूर करावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शेत व शिव पानंद रस्ता चळवळीचे उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे पाटील यांनी केले.

नेवासा तालुक्यातील ‘पाचेगाव येथे मॉडर्न रोड मॉडेल व्हिलेज’ संबंधात जनजागृती बाबत सभा संपन्न झाली. ‘मॉडर्न रोड मॉडेल व्हिलेज’ ही संकल्पना महाराष्ट्र राज्य शेत व शिवपाणंद रस्ते चळवळीचे प्रणेते व अध्यक्ष शरदराव पवळे यांच्या संकल्पनेतून पुढे आली आहे. त्या संबंधातील माहिती महाराष्ट्र राज्य शेत व शिव पानंद रस्ता चळवळीचे उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे पाटील यांनी विषद करून या अंतर्गत नुकत्याच



शासनाने काढलेल्या शासन निर्णयाप्रमाणे नकाशावर असलेली रस्ते वहिवाट आहे. परंतु नकाशावर नसलेली रस्ते गावांची यादी करणे व विशेष ग्रामसभेत ठरावाने मंजूर करून घेणे व तहसीलदारांना सादर करण्यासाठी सर्वांनी एक येणे गरजेचे असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

सरपंच वामन भाऊ तूवर यांनी अतिक्रमित रस्त्यासंबंधी असलेली प्रकरणे निपटारा करण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून आपणही सक्रिय होणार असल्याचे सांगितले. यावेळी चळवळी-चे कार्यकर्ते श्रबाळासाहेब थोरात, कानिफनाथ कदम, प्रशांत चौधरी, सग-ाजी ऐणर, विठ्ठल करमड, हरिभाऊ तुवर, पाचेगाव ची ग्रामपंचायत सदस्य ज्ञानदेव द्वारकानाथ आढाव, अण्णासाहेब विठ्ठल जाधव, ज्ञानदेव आचपळे उपस्थित होते.

# ऐतिहासिक वास्तू जपणे सर्वांची जबाबदारी : संजीवनी पाटील

## सुवर्णयुग मंडळाच्यावतीने किल्ल्याची सफाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** आपल्या गावातील व परिसरातील ऐतिहासिक वास्तू या आपल्याला आपल्या इतिहासाची, परंपरेची आणि संस्कृतीची आठवण करून देतात. त्यांचे जतन करणे हे केवळ शासनाचे काम नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी निस्वार्थ भावनेने सुवर्णयुग तरुण मंडळाने समर्थपणे पार पाडत वारसा जपण्याचे काम केले आहे. मंडळाच्या या उपक्रमामुळे पुढील पिढ्यांना आपल्या इतिहासाची जाणीव राहील, असे प्रतिपादन खर्डा गावच्या सरपंच तथा भाजप महिला अध्यक्षा संजीवनी पाटील यांनी केले.

सुवर्णयुग तरुण मंडळ पाथर्डी यांच्यावतीने किल्ले शिवपट्टण (खर्डा ता. जामखेड) येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याप्रसंगी संजीवनी पाटील बोलत होत्या. यावेळी बाजार समितीचे संचालक वैजीनाथ पाटील, ग्रामपंचायत सदस्य महालिंग कोरे, भाजपा तालुका सरचिटणीस



बाळासाहेब गोपाळघरे,विस्तार अधिकारी अशोक आंधळे, केशव गायकवाड, धीरज उदमले, हुसेन बादशाह, मंडळाचे अध्यक्ष गोपालसिंग शेखावत, वैभव शेवाळे आदी उपस्थित होते.

मंडळाने किल्ल्याच्या आ-तील पायऱ्यांवरील, प्रवेशद्वार येथील झाडाझुडपे, गवत आणि कचरा गोळा करून स्वच्छता केली. मंडळाचे मो-हनजी यादव, अमोल कांकरिया, मोनिष उदबत्ते,ओमकार जोशी, मोनल जोजारे, शैलेंद्र दहिफळे, अक्षय दातीर, ओम पा-चरणे, मुकुंद सुराणा, कुणाल महानवर, दत्ता पंडित, सचिन आल्हाट, सनी भोसले, अभी कांबळे, किरण दिनकर, अजिंक्य घोरपडे, लखन दोडके आदी उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य महालिंग कोरे यांनी आभार मानले.वैजीनाथ पाटील म्हणाले, आजच्या पिढीला इतिहासाची खरी जाणीव करून देणे गरजेचे आहे. आपण आपला इतिहास विसरले तर आपली मुळेच हरवतील. त्यामुळे अशा उपक्रमातून मंडळाने समाजात जागरूकता निर्माण करून एक पाऊल पुढे टाकले आहे. ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी सरकार, ग्रामपंचायत आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्र येणे गरजेचे आहे. सुवर्णयुग मंडळाने जो आदर्श ठेवला आहे, तो प्रत्येक संस्थेने आत्मसात करावा.

# संपादकीय

## आरक्षण आणि मर्यादा

मराठे लढाया जिंकतात, तहात हरतात असे म्हटले जाते. तेच मराठा आरक्षणाच्या लढाईत झाले. वस्तुत: शासकीय अध्यादेश म्हणजे कायदा नाही, याचे भान ठेवावे लागेल. सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीअगोदर मुत्सद्दीपणा दाखवून आंदोलनातून मार्ग काढला. अर्थात त्यामागे उच्च न्यायालयाचे ताशेरे आणि मराठा आंदोलकांची संघटनात्मक ताकद कारण असली, तरी ही लढाई अजून संपलेली नाही. न्यायालयात टिकणारे आरक्षण दिल्याचे मुख्यमंत्र्यांसह सर्वांनी सांगितले असले, तरी सरकारने आता वेळ निभावून नेली आहे, हे स्पष्ट दिसते. मराठा आरक्षणासंबंधी उपसमितीचे अध्यक्ष असलेल्या राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात आलेल्या शिष्टमंडळाने आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्यावर आणि अध्यादेश दिल्यानंतर जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले. त्यानंतर मराठा आंदोलकांनी एकच जल्लोष साजरा केला. गुलाल उधळला; परंतु असाच गुलाल खारघरमध्येही उधळला होता, हे विसरून चालणार नाही. मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण देणे खरेच शक्य आहे का, सरकारने घेतलेला निर्णय कायदेशीर चौकटीत टिकणार आहे का, हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देता येईल का, मराठा आरक्षण देण्यासंदर्भात आणि टिकण्यासंदर्भात कोणकोणती आव्हाने आहेत असे विविध प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत आणि त्याची उत्तरे सरकारच्या अध्यादेशात मिळत नाहीत. कुणबी आणि मराठा एकच असल्याचा निर्णय मागे रत्नागिरी जिल्ह्यापुरता घेण्यात आला होता आणि तिथूनच ही मागणी सुरू झाली. पश्चिम महाराष्ट्रामध्ये कुणबी असल्याचे प्रमाणपत्र काही जुन्या रेकॉर्ड्सनुसार मिळते; मात्र मराठवाड्यात तसे होत नाही. त्यामुळे त्यांना ती अडचण राहू नये, म्हणून सरसकट कुणबी म्हणूनच आरक्षण द्यावे, अशी मागणी जरांगे पाटील त्यांच्या सहकाऱ्यांनी केली होती. ती कायद्याच्या चौकटीत टिकणारी नव्हती, असे सरकारचे म्हणणे होते. आरक्षण समूहाला नाही, तर व्यक्तीला कागदोपत्री पुराव्याच्या आधारे दिले जाते, हे म्हणणे आंदोलनकर्त्यांच्या गळी उतरवण्यास सत्ताधारी यशस्वी झाले. सामाजिक मागासलेपणाच्या निकषांमध्ये कुणबी समाज बसला, त्यामुळे त्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळाले. १९५२ पासून या विषयावर नेमण्यात आलेल्या सहा आयोगांपैकी तीन केंद्र सरकारचे आणि तीन राज्य सरकारचे होते. त्यांच्या अभ्यासात मराठा समाज मागासलेला नाही, असे म्हटले होते. त्यातील फक्त गायकवाड आयोगाने मराठा समाजाचे सामाजिक मागासलेपण सिद्ध केले आहे; परंतु डेटा विश्वासार्ह नाही, असा हवाला देत त्यांचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे आज जरी सरकारने आरक्षण देऊ केले असले, तरी पुढे ते न्यायालयात टिकवण्याचे आव्हान आहे. जरांगे पाटील यांनी हैदराबाद, सातारा आणि औंध गॅझेट लागू करण्याचा आग्रह धरला होता. त्यापैकी आता हैदराबाद गॅझेटचा स्वीकार करण्याचे सरकारने मान्य केले. आता सरकार मराठा समाजात फूट पाडण्यात यशस्वी झाल्याची पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाची भावना आहे. हैदराबाद गॅझेट लागू केले, तर मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण देता येईल. कारण १९१८ च्या निजाम शासनाच्या आदेशात मराठा समाजाची नोंद मागास म्हणून आहे. तेव्हा शिक्षण व नोकऱ्यांमध्ये निजामाने आरक्षण दिले होते. तेव्हाचे हैदराबाद गॅझेट आज कसे लागू करायचे व ते कायद्याच्या चौकटीत कसे बसवायचे हा पेच राज्य सरकारपुढे आहे.

मराठा आरक्षणासाठी ऐतिहासिक पुरावा आणि आधार म्हणून हैदराबाद गॅझेटचा संदर्भ दिला जातो. यानुसार 'इम्पीरियल गॅझेटीअर ऑफ इंडिया' या नावाचे एक डॉक्युमेंट आहे. यावर 'प्रोव्हिन्शियल सिरीज, हैद्राबाद स्टेट १९०१' असा उल्लेख आहे. हा एक ब्रिटिशकालीन दस्तावेज असून यात त्या वेळेच्या हैदराबाद स्टेटची जनगणना आहे. त्यात त्या वेळची शहरे, गावे, गावातील लोकसंख्या, त्यांची जनगणना, शहरातील वैद्यकीय, शैक्षणिक परिस्थितीची आकडेवारी, शहरातील शेती, नद्या अशा सर्व बाबींची विभागवार माहिती नमूद आहे. याचाच आधार किंवा संदर्भ घेतला जातो. त्या वेळी 'हैद्राबाद स्टेट'अंतर्गत औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी आणि उस्मानाबाद हे मराठवाड्यातील पाच जिल्हे अंतर्भूत होते. ब्रिटिशांच्या जनगणनेत जातींची नावे आणि लोकसंख्या नमूद केली आहे. यात मराठा, कुणबी या जातींचा उल्लेख स्वतंत्र नसून एकत्रित केला गेला आहे. म्हणून हैंद्राबाद गॅझेटचा आधार घेतला जात आहे. गॅझेटियर लागू करा म्हणजे काय, तर त्या वेळी कुणबी म्हणून जी लोकसंख्या गणली गेली, ती लोकसंख्या ग्राह्य धरून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्या असा तो विषय आहे. गॅझेटियर हा वस्तुस्थिती सिद्ध करण्यासाठी एकमात्र पुरावा कधीच होऊ शकत नाही. कारण यातून एवढेच सिद्ध करण्याचा प्रयत्न होईल, की मराठा आणि कुणबी एक आहेत. याव्यतिरिक्त ते खरोखर एक आहेत की नाहीत, हे अनेक सामाजिक संदर्भांसह पाहिले जात असते. कागदोपत्री पुरावे महत्त्वाचे असतात. जुन्या पुस्तकांमध्ये संदर्भ असतात किंवा संशोधकांनी केलेली कामे पाहिली जातात. त्याचा हा एक कागदोपत्री पुरावा आहे. सरकारने अध्यादेश काढला असला, तरी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार का, असा सवाल उपस्थित होत होता. मुख्यमंत्र्यांनी नाही म्हटले असले, तरी एकूण अध्यादेश आणि कागदपत्र पाहिली, तर कुणबी-मराठ्यांना ओबीसीमधूनच आरक्षण मिळणार असल्याचे स्पष्ट आहे. कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा या तीन वर्गांमध्ये हे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रमाणपत्रांची पडताळणी पूर्ण झाली की मराठ्यांना ओबीसीचे लाभ मिळणार आहेत. यामध्ये सरसकट मराठे येणार नाहीत, तर गरीब मराठे, अल्पभूधारक मराठे यांची सोय करण्यात आली आहे. तसेच त्रिसदस्यीय समिती ही गावपातळीवर असणार आहे. १९६७ च्या पूर्वीचे पुरावे असतील तर ते, अन्यथा एका शपथपत्रावर मराठ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. एवढी ही सोपी प्रक्रिया असली तरी ओबीसी समाजाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके तसेच ॲड. गुणरत्न सदावर्ते यांची प्रतिक्रिया पाहता आरक्षणाची लढाई अजूनही संपलेली नाही. जरांगे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ती जनरेटा आणि कायदेशीर मार्गाने लढावीच लागणार आहे. अर्थात ते करताना ताज्या आंदोलनात झाली तशी रस्त्यावरची लढाई केली जाणार नाही, याचे भान राखावे लागेल.

# डाकिया डाक लाया...



पत्रव्यवहार हा अनेकांच्या हृदयातला एक हळवा, नाजुक आणि भावनाप्रधान असा कोपरा असतो. आजही अनेकांच्या कपाटात जपून ठेवलेल्या जुन्या पत्रांची चळत सापडेल. एक सप्टेंबर हा दिवस विश्व पत्र दिन म्हणून साजरा केला जातो. भावनिकच नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही पत्रविश्वाला मोठे महत्व आहे. त्यानिमित्ताने पत्रव्यवहार या लोप पावत चाललेल्या एका जिव्हाळ्याच्या संदेशवहनाला उजाळा देण्याचा एक प्रयत्न.

'पत्र लिही पण नको पाठवू शाई मधून काजळ गहिरे,
लिपी रेषांच्या जाळीमधूनि, नको पाठवू हसू लाजरे.
चढण लाडकी भुवई मधली, नको पाठवू वेलांटीतून,
नको पाठवू तीळ गालीचा पूर्णविरामाच्या बिंदूतून.'

इंदिरा संत यांची ही कविता वाचताना आपण (अर्थातच मध्यमवयीन पिढी) भूतकाळात केव्हा प्रवेश करतो हे समजतही नाही. आणि पत्रांच्या त्या अनोख्या, जादुई विश्वात हरवून जातो. पत्रव्यवहार हा अनेकांच्या हृदयातला एक हळवा, नाजूक आणि भावनाप्रधान असा एक कोपरा असतो. आजही कित्येकांच्या कपाटात, जपून ठेवलेल्या जुन्या पत्रांची चळत सापडेल याची खात्री आहे. एक सप्टेंबर हा विश्व पत्र दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने पत्रव्यवहार या लोप पावत चाललेल्या एका जिव्हाळ्याच्या संदेश वहनाला उजाळा देण्याचा एक प्रयत्न करायला हवा.

मानवी जीव हा संवादाशिवाय राहू शकत नाही. अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणे संवाद ही त्याची प्राथमिक गरज आहे. आदिमानवाच्या हाळी देणाऱ्या संवादापासून आजच्या इन्स्टाग्रामपर्यंतचा संदेशवहनाचा हा प्रवास विलक्षण थक्क करणारा आहे. पण यात सगळ्यात सहज सोपे, लोकप्रिय, प्रभावी आणि अनेक शतकांपासून अविरत सुरू असलेले माध्यम म्हणजे पत्रलेखन अर्थात टपाल सेवा. टपाल सेवेच्याही आधी पत्रलेखन होतेच. पण पोस्ट खाते नसल्याने निरोप्यांच्या हाती पत्र पोचवले जात असे. पौराणिक काळात रुक्मिणीने कृष्णाला आपल्या प्रेमाची कबुली देण्यासाठी पत्र लिहिल्याची नोंद आहे. चांगदेवाने तर ज्ञानेश्वरांना कोरे पत्र पाठवले. त्याचा अर्थ मुक्ताबाईला समजला आणि चांगदेवांना मुक्ताबाईसारखा गुरु लाभला आणि चांगदेव पासष्टीची निर्मिती झाली. पत्रातील 'ध' चा 'मा' केल्यामुळेच पेशवाईत अनर्थ घडला.

**वेध**

**– डॉ साधना आशुतोष कुलकर्णी**

थोडक्यात काय, मानवी जीवनात पत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे.

ईस्ट इंडिया कंपनीने १६८८ मध्ये मुंबई आणि चेन्नई येथे टपालसेवा सुरू केली. १७७४ मध्ये ती संपूर्ण देशात सुरू झाली. १८७८ मध्ये जागतिक पातळीवर युनिव्हर्सल पोस्टल युनियनची स्थापना झाली आणि जास्तीत जास्त देश या युनियनचे सभासद असणारी ही एकमेव संघटना आहे. भारतात २५० वर्षांपासून तर पाश्चात्त्य देशात त्याही आधीपासून पत्रलेखनाची परंपरा आहे. अनेक थोर विचारवंत, तत्त्वज्ञ, साहित्यिक, लोकनेते, शासनकर्ते यांनी पत्रलेखनाला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित नेहरू, मार्टिन ल्युथर किंग, अब्राहम लिंकन, थोरो, साने गुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा अनेक महानुभावांनी पत्रलेखनातून अमूल्य असे साहित्यिक, वैचारिक समाजप्रबोधन केले. त्यामुळेच या पत्रसंपदेच्या संग्रहाची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आणि अशा असामान्य पत्रांना साहित्याचा दर्जा देऊन पत्रवांग्यय म्हटले गेले. हा एक ऐतिहासिक दस्तावेज असून त्या काळच्या संस्कृतीचा, राजकीय, सामाजिक परिस्थितीचा, लेखकाच्या मनोवृत्तीचा, व्यक्तिमत्त्वाचा धांडोळा त्यातून घेता येतो. अनेक विद्यापीठांमध्ये या पत्रवाययाला संदर्भ ग्रंथ म्हणून जतन केले आहे. इतिहास संशोधकांना तर पत्रवाययातून अनेक महत्त्वाचे दुवे हाती लागतात. अलीकडच्या साहित्यात 'लोकहितवादींची शतपत्री', 'विश्रब्ध शारदा', नरहर कुरुंदकरांची समीक्षात्मक पत्रे, जीए कुलकर्णी आणि ग्रेस, सुनीताबाई देशपांडे आणि जी. ए. कुलकर्णी यांच्या पत्रांनी साहित्यात मोलाची भर टाकली.

वैयक्तिक पत्र व्यवहाराची तर गोष्टच वेगळी. हा एक हळवा, आनंददायी आणि स्नेह वृद्धिंगत करणारा अनुभव असतो. ही पत्रे औपचारिक आणि अनौपचारिक असतात. औपचारिक पत्रे, नोकरी-व्यवसाय, शासकीय, कार्यालयीन संबंधित असतात. त्यात स्वहस्ताक्षर नसते. मात्र अनौपचारिक पत्र लिहिणे व घरी आलेले पत्र वाचणे ही प्रक्रिया मनाला आनंद देणारी असते. आपल्या संबंधित व्यक्तिला पत्र लिहिण्यासाठी कागद पेन घेऊन विचार करणे, भावनांना शब्दांची जोड देऊन प्रत्यक्ष कागदावर लिहिणे, ही रचनात्मक प्रक्रिया आहे. पत्र म्हणजे साचेबंद उत्तर किंवा निबंध नसतो. तो दोन व्यक्तिंमधला संवाद असतो. त्यामुळे मनातले विचार मेंदूतून हृदयाद्वारे बोटामध्ये येतात आणि शाईच्या साह्याने शब्दांमध्ये प्राण फुंकले जातात. कागदाला, पेनला जिवंत माणसाचा स्पर्श होणे, जे बोलणे शक्य नाही ते पत्रात लिहिणे, त्यातून डोकावणारी मनस्थिती, संस्कार, व्यक्तिमत्व, स्वभाव हे सगळे विलक्षण जिवंत आणि चैतन्यपूर्ण असते. पत्राची वाट पाहण्यात हुरहुर, उत्कंठा, अधिरता याबरोबरच संयमही असतो. प्रत्येक टप्प्यावर जिवंतपणाच्या स्पर्शाची खूण बाळगत अखेर पोस्टमनच्या हातून पत्र आपल्याला मिळते. त्यामुळे या जिवंत संदेशवहनाची तुलना कोणत्याही माध्यमाशी होऊ शकत नाही.

पत्रामधील हस्ताक्षर हे आठवण, प्रेम, मनाची घालमेल-आंदोलने अशा अनेक बाजू स्पष्ट करत असते. हस्ताक्षर ही प्रत्येक व्यक्तीची ओळख असल्याने पत्र वाचताना लिहिणारी व्यक्ती आपल्यासमोर साकार होत असते. पत्रलेखनामुळे विचार, भावना, बुद्धी, भाषाशैली, हस्ताक्षर, शब्दसंपदा या अंगभूत कौशल्यांना वाव मिळत असतो. कागदावर हाताने, पेनाच्या मदतीने लिहिणे ही एक संपूर्ण वैयक्तिक क्रिया आहे. ती एकाग्रता वाढवते. ही समाधान देणारी, स्वनिर्मितीची एक कृती असते. त्याची तुलना कीबोर्डवर लिहिलेल्या लेखनाशी होऊ शकत नाही. पत्र लिहिण्यासाठी अक्षर ओळख, कागद आणि स्पेन एवढीच सामग्री लागते. तिच्या मदतीने जगातली कोणतीही व्यक्ती पत्र लिहू शकते. पत्र डिलीट होत नाहीत. इकडची पत्रे तिकडे फॉरवर्ड करण्याची सोय पत्रव्यवहारात नाही. ही सर्वात मोठी ताकद पत्रलेखनात आहे! वैयक्तिक पत्रातही नवनिर्मिती सर्जनशीलता असते आणि साहित्यिक मूल्य नसले तरी त्यात वाचणाऱ्याचा दिवस उजळून टाकण्याची क्षमता असते.

वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहता पत्रलेखन ही एक उपचारपद्धती आहे. पत्र लिहिण्याच्या विचारानेच व्यक्तीला उत्साह वाटू लागतो. मनात सकारात्मकता निर्माण होते. मेंदूच्या पेशी उत्तेजित होतात. कागद पेनाचा स्पर्श हाताला होताक्षणी विचार आणि भावनांच्या निर्मितीला चालना मिळते. या भावनांना शब्दरूप देण्यासाठी बुद्धी कार्यान्वित होते. प्रत्यक्ष लिखाण करताना बोटे, हात, पाठीचा कणा, मान, डोळे आणि मेंदू यांचा समन्वय होऊन एकाग्रता साधली जाते. ही संपूर्ण प्रक्रिया शरीर आणि मनाला एक सकारात्मक ऊर्जा देते. सेन्सरी आणि मोटॉर या दोन्हीही मज्जासंस्थेला सक्रियता देण्यासाठी पत्रलेखन ही एक उपचारपद्धती आहे, त्याला 'मेंटल वर्कआउट' म्हणतात. पत्रलेखनामुळे डिप्रेशन आणि एकाकीपणा कमी होतो. मनात साचलेले विचार कागदावर उतरवले की उदासीनता कमी होते. थोडक्यात काय, तर वैयक्तिक, सामाजिक, वैद्यकीय, व्यावसायिक, शैक्षणिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक या सगळ्या क्षेत्रांना पत्रव्यवहाराने समृद्ध केले आहे.

डिजिटल माध्यमाच्या आहारी जाऊन आम्ही आज पत्रव्यवहार बंद केला आहे. परंतु त्यामुळे पत्रव्यवहाराचे महत्त्व कमी होत नाही. म्हणूनच ऑस्ट्रेलियन लेखक रिचर्ड सिंपकीन याने २०१४ पासून एक सप्टेंबर हा जागतिक पत्रलेखन दिवस साजरा करणे सुरू केले आहे. तसेच पत्रलेखनाला चालना देण्यासाठी भारतीय टपाल विभागातर्फे दरवर्षी पत्रलेखन स्पर्धा आयोजित होत असते. 'ढाई आखर' हे या स्पर्धेचे नाव असून त्यात अठरा वर्षाखालील आणि अठरा वर्षावरील असे दोन वयोगट केले आहेत. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असते. विशेषतः शालेय मुलांमध्ये पत्र लेखनाला उत्तेजन देण्यासाठी, शाळांमधून हा उपक्रम राबवला जातो.

आज मध्यमवयीन पिढी तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन स्वतः हाताने लिहिण्याचे विसरत चालली आहे, तर पत्रलेखन 'आउटडेटेड' समजले जाते. हस्ताक्षर आणि पत्रलेखन ही आपली कौशल्ये आहेत. यांचा वापर न केल्यास हे कौशल्य अस्तंगत होईल. आज अनेक मध्यमवयीन लोक लिहिण्याचा सराव नसल्याने लिहू शकत नाहीत. हे किती गंभीर आहे. डिजीटल युगाचा वेग, संदेशवहनातील सहजता, क्षणात जगभर पोहोचण्याचे सामर्थ्य हे सर्व मान्य आहे. काळाची ती गरज आहे. पण त्यासाठी पत्रव्यवहार या समृद्ध, लोकप्रिय, सांस्कृतिक, दीर्घकालीन संदेशवहनाचा बळी देण्याची काहीच गरज नाही. इंदिरा संतांच्या कवितेचाच आधार घेत सांगायचे तर...

'नको पाठवू अक्षरातुनि, शब्दांमधले गहिरे स्पंदन,
कागदातुनि नको पाठवू स्पर्शामधला कंप विलक्षण,
नको पाठवू असे कितीदा सांगितले मी, तू हट्टी पण,
पाठविसी ते सगळे सगळे, पहिल्या ओळीमध्येच मिळते.
पत्रच पुढचे त्यानंतर पण वाचायाचे राहून जाते.'

अशी शब्दातीत संवेदना एसएमएसमधून मिळतील का हो?

पान १ वरून

## आरक्षणाचा जीआर सरसकट नाहीच

राज्य होते. त्यामुळे इंग्रजांच्या राज्यातील पुरावे हे इतर ठिकाणी मिळतात, तसे मराठवाड्यात मिळत नाहीत. मराठवाड्यातील पुरावे हे निजामाच्या म्हणजे हैदराबाद गॅझियटमध्ये मिळतात. त्यामुळे तेथील पुरावे आपण ग्राह्य धरले. त्यामुळे जे खरे कुणबी असतील त्यांनाच हे आरक्षण मिळेल. फडणवीस म्हणाले, मला असे वाटते की, यातून (जीआर) जे काही खरे हक्कदार आहेत, त्यांनाच ते मिळेल. पण कुणालाही खोटेपणा करता येणार नाही. अशा प्रकारचा हा जीआर आहे. अनेक ओबीसी संघटनांनी त्याचे स्वागत केले आहे. आमच्या मनात कोणतीही शंका नाही असे त्यांचे म्हणणे आहे. भुजबळ व इतर नेत्यांच्याही मनातील शंका आम्ही दूर करू. ओबीसी नेत्यांनाही एक गोष्ट माहिती आहे की, जोपर्यंत हे राज्य आहे तोपर्यंत ओबीसीवर अन्याय होऊ शकत नाही. जोपर्यंत हे राज्य आहे तोपर्यंत एका समाजाचे काढून दुसऱ्या समाजाला देण्याचा विचार होऊ शकत नाही. आम्ही मराठ्यांचे मराठ्यांना देणार, ओबीसींचे ओबीसींना देणार आणि ज्यांना खरा अधिकार आहे त्यांना ते ते देणार. कुणाचे काढून कुणाला केव्हाच देणार नाही. दोन समाजाला एकमेकांपुढे केव्हाच उभे करणार नाही. फडणवीस म्हणाले, अनेकदा समजुती गैरसमजुती होतात. अनेकदा काही लोक जाणिवपूर्वक गैरसमजुती तयार करतात. पण आम्ही जे काही राजकारण शिकलो, त्या राजकारणात पथ का अंतिम लक्ष्य नहीं है, सिंहासन चढ़ते जाना. सब समाज को लिए साथ में, आगे हे चलते जाना, हे आमचे ब्रिद वाक्य आहे. त्यामुळे सगळ्यांना सोबत घेऊन आम्हाला पुढे जायचे आहे. मराठा समाज एक महत्वाचा समाज आहे. या महाराष्ट्राच्या जडणघडणीत एक मोठे योगदान देणारा हा समाज आहे. पण त्यासोबतच ज्या अठरापगड जाती आहेत, ज्यांनी स्वराज्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे मावळे म्हणून काम केले आहे. त्यांनीही बलिदान दिले आहे. कुणावरही अन्याय होऊ नये ही आमची भावना आहे. ही भावना पुढेही राहील. राज्य सरकारने मराठा आंदोलकांवरील यापूर्वीचे गुन्हे मागे घेण्याचा शब्द दिला आहे. पण या प्रकरणी आणखी ९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्याचे काय करणार? असा प्रश्न पत्रकारांनी यावेळी फडणवीसांना विचारला. त्यावर त्यांनी हे गुन्हे उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार दाखल करण्यात आल्याचे सांगितले. आत्ताचे गुन्हे हायकोर्टाच्या आदेशांनुसार दाखल झालेत. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणूनच त्यावर योग्य तो निर्णय घ्यावा लागेल.

## मोदींकडून दिवाळी गोड करण्याचे कार्य

सर्वसामान्य माणसाला या ठिकाणी मोठा फायदा होईल. त्यामुळे दळणवळण वाढीस लागेल, खऱ्या अर्थाने अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल. सर्वसामान्य ग्राहकाला बाजारपेठेतील खरेदीत फायदा होणार आहे, त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पने जो टॅरिफ लावलेला आहे, त्याचे जे नुकसान आहे ते अमेरिकेला होईल. या ट्रम्प टॅरिफमुळे भारत आत्मनिर्भर्तेकडे जातोय, भारत सक्षम होईल. ट्रम्पच्या टेरीफला चोख उत्तर दिल्याचे जीएसटीच्या निर्णयावरून दिसून येते. असे शिंदे म्हणाले. प्रधानमंत्री म्हणाले होते की, या देशाचे जे शेतकरी असतील, सर्वसामान्य माणूस असेल त्याबाबतीत कुठलीही तडजोड असेल ती या ट्रम्प टॅरीफमुळे केली जाणार नाही, त्यांचे हक्क आणि अधिकार अबाधित राहतील. मोदींनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे, ते बोलतात तसेच करतात. आपल्या देशाची अर्थव्यवस्था ११ व्या नंबरवरुन ५ व्या, आता चौथ्यावरुन तिसऱ्यावर आणण्याचे मोदीजींचे स्वप्न पूर्ण होईल, आणि आपला देश आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करतांना दिसून येईल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी बोलून दाखवला आहे.

तसेच ना. शिंदे म्हणाले, हा नवा भारत आहे, पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली पुढे जातो आहे आणि देशाचा डंका संपूर्ण जगात वाजवला जातोय. त्यामुळे, विरोधकांना ही एक मोठी चपराक आहे, कारण राजकारणात काम करत असताना मोदीजी देशाचा विचार करतात. देश आर्थिक महासत्तेकडे नेण्याचा विचार करतात, विकसित भारत २०४७ चा विचार पाहता दुर्दैवाने देशात आणि विदेशात गेल्यावर राहुल गांधी आणि इंडिया आघाडी त्यांच्यावर टीका करतात हे दुर्दैवी आहे, अशी टीका देखील शिंदे यांनी विरोधकांवर केली आहे.

## दाढ दुखणे थांबले असेल तर खाणाऱ्यांनी उत्तर द्यावे : आ. पवार

आता तरी जाग येईल का? दाढ दुखणं थांबलं असेल तर खाणाऱ्यांनी उत्तर द्यावं. काहीही झालं तरी या दलालांना आम्ही सोडणार नाही आणि अजीर्ण होईपर्यंत खोलं पचवू देणार नाही, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

मराठा साम्राज्याविरोधात ब्रिटिशांना मदत केल्याप्रकरणी नवी मुंबई परिसरातील तब्बल ४ हजार एकरहून अधिक जमीन ब्रिटिशांनी बिवलकर नामक कुटुंबाला दिली होती. पण नंतर विविध कायदे, नियम व निकालानुसार ही जमीन सरकार दरबारी जमा झाली. परंतु बिवलकर कुटुंबीयांनी वेगवेगळ्या प्रकारे गोलमाल करून ही पुन्हा आपल्या नावे करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात मंत्री संजय शिरसाट यांनी सिडकोचे अध्यक्षपद ग्रहण केल्यानंतर १५ एकर जमीन त्यांना परत मिळवून मदत केली. या जमिनीचा सध्याचा बाजारभाव ५ हजार कोटी रुपये आहे. त्यामुळे या जमिनीवर सिडकोला गरीबांसाठी सुमारे १० हजार घरे बांधता आली असती. पण गरीबांच्या हक्काची जमीन शिरसाट यांनी बिवलकर कुटुंबाच्या घशात घातली, असा आरोप रोहित पवार यांनी केला होता.

## भुजबळांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा : राऊत

पाटील हे खूश होऊन गेले असतील तर त्यांच्या मागण्या मान्य झाल्या असतील. आत्ता इतर अभ्यासकांचे जे काही म्हणणे आहे, त्यात शिवसेना आपले मत याक्षणी व्यक्त करणार नाही. मराठा समाजातल्या तरुणांना मनोज जरांगे पाटील म्हणतायत, त्यानुसार लाभ झाला असेल, होणार असेल तर त्याचे आम्ही स्वागत करतो, असे संजय राऊत म्हणाले.

मराठा आरक्षणावर ओबीसी नेत्यांनी आक्षेप घेतला आहे. त्यावरही संजय राऊत यांनी यावेळी भाष्य केले. ते म्हणाले, छगन भुजबळ यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मंत्रिमंडळात जागा दिली नव्हती. ओबीसींचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांनी विशेष लक्ष घालून देवेंद्र फडणवीस यांना सांगून मंत्रिमंडळात घेतले. आज भुजबळ अजित पवारांच्या कृपेने नाही तर ते नरेंद्र मोदींच्या कृपेमुळे मंत्रिमंडळात आहेत. मोदी स्वतःला ओबीसींचे नेते मानतात.

पान १ वरून

## मराठ्यांना आरक्षण मिळवूनच देणार

ही चांगली बाब आहे. गोरगरीब ओबीसींचे काम होणार असेल, तरी ही चांगली गोष्ट आहे. त्यावर आमची काही हरकत नाही. पण मी माझ्या समाजाला आरक्षण मिळवून देण्यास सक्षम आहे. कोणी कितीही उपसमित्या केल्या, टोळ्या माझ्या अंगावर पाठवल्या, राजकारणी लोकांचे ऐकून मराठवाड्याचा काढलेला जीआरबाबत कितीही अफवा पसरवल्या, तरी माझ्या गरिबाला आरक्षण मी देतोय, हे मराठ्यांना पटलेले आहे. त्यामुळे आम्ही टेन्शन घेत नाही. ओबीसीत मराठ्यांना मीच घालणार, असेही मनोज जरांगे यांनी ठामपणे सांगितले. मराठवाड्यातील मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय, मी आणि माझा समाज मागे हटणार नाही. त्यामुळे कितीही काही झाले, तरी आम्हाला त्याचा फरक पडत नाही. ओबीसी समाजासाठी उपसमिती स्थापन केल्याबद्दल जरांगे यांनी समाधान व्यक्त केले, मात्र त्याचसोबत इतर समाजासाठीही अशाच समित्या स्थापन करण्याची मागणी त्यांनी केली. ओबीसी समाजाला जशी उपसमिती गठीत केली, तशी दलित मुस्लिमांसाठी देखील उपसमिती गठीत करा. एक उपसमिती शेतकऱ्यांसाठी करा. आदिवासींसाठी एक करा आणि मायक्रो ओबीसीसाठी एक उपसमिती करा. कारण ओबीसीची उपसमिती मायक्रो ओबीसीसाठी काही कामा येणार नाही. असे मतही त्यांनी यावेळी मांडले. महामंडळ केल्याप्रमाणे या उपसमित्या तयार करा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. माझा विषय आरक्षण आहे. त्यासाठी मी तुटून पडलेलो आहे. कुणी कितीही आमच्या संभ्रम निर्माण केला, तरी माझा समाज कुणावर विश्वास ठेवत नाही. मी पण कुणावर विश्वास ठेवत नाही. जे आता बोंबलत आहेत, जीआरबद्दल संभ्रम निर्माण करत आहेत, हे आधी कुठे झोपले होते? असा सवालही मनोज जरांगे यांनी उपस्थित केला. बैठकीला बोलावल्यावर हे लोक येत नाही आणि मग कुरापती करतात. हे लोक बोंबलत आहेत, तर बोंबलू द्या, पण मी मराठवाड्यातील सगळा मराठा समाज आरक्षणात घालणार. थोड्याच दिवसात हे मराठ्यांना दिसणार. त्यामुळे मराठ्यांनी संभ्रम निर्माण करून घेऊ नये, अशी विनंती मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना केली.

## पंजाब-हरियाणामध्ये पूर

लागले आहे. गुरुवारी सकाळी झालेल्या पावसामुळे मोनेस्ट्री मार्केटमधील रस्ते एक फूटापर्यंत पाण्याने भरले होते. मयूर विहार फेज-१ जवळ पूरग्रस्तांसाठी बनवलेल्या मदत शिबिरांमध्ये यमुनेचे पाणी भरले होते. राष्ट्रीय महामार्ग-४४ वरील उड्डाणपुलाचा काही भाग अलीपूर परिसरात कोसळला. बुधवारी संध्याकाळपर्यंत दिल्लीतील यमुनेची पाण्याची पातळी २०७.३३ मीटरपर्यंत पोहोचली होती. यमुनेची ही आतापर्यंतची तिसरी सर्वोच्च पातळी आहे. यापूर्वी १९७८ मध्ये ती २०७.४९ मीटर आणि २०२३ मध्ये २०८.६६ मीटरपर्यंत पोहोचली होती.

हिमाचल प्रदेशातील कुल्लू येथे काल गुरुवारी सकाळी भूस्खलनात दोन घरे कोसळली. यामध्ये एकाचा मृत्यू झाला. ६ लोक आत अडकले आहेत. बुधवारी कुल्लूमध्येही भूस्खलन झाले. ढिगाऱ्याखाली गाडलेल्या एनडीआरएफ जवानाला २४ तासांनंतर काल वाचवण्यात यश आले.

## तुम्ही पुढचे ४० वर्षे जमिनीवरच राहणार

संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथे जनसेवा युवा मंचच्या फलकाचे अनावरण माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मच्छिंद्र वाणी होते. यावेळी थोरात गटाच्या मंगेश व्यवहारे, जालिंदर वाणी, रोहित व्यवहारे, रवींद्र वाणी यांनी भाजपात प्रवेश केला. डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, लोकसभा आणि विधानसभेच्यावेळी प्रत्येक माणूस म्हणत होता, विखे परिवार संपवायचा, आता ही यांची शेवटची निवडणूक. यापुढे विखे पाटलांची निवडणूक होऊ शकत नाही आणि आता? असा प्रश्न उपस्थित करत ते म्हणाले की, आश्वासन देण्याचा काळ गेला. आश्वासन देणारे लोक संपले. कोणी हा विचार केला होता की, अमोल खताळ आमदार होऊ शकतात. सामान्य माणसाच्या ताकदीवर ज्याला काहीही राजकीय अस्तित्व नाही असा माणूस आपण आमदार करून दाखवला ही गोरगरीब जनतेची ताकद आहे. नव्याने संघटन बांधत असताना जुन्या लोकांनी केलेल्या कामाचा आणि त्यागाचा विसर पडता कामा नये. वसंत देशमुख यांनी धांदरफळमध्ये केलेले वक्तव्य, त्या वक्तव्यानंतर झालेली दंगल आणि त्या दंगलीनंतर झालेला प्रचार या प्रचारानंतर देखील संगमनेर तालुक्याच्या जनतेने सुजय विखेलाच आमदार करायचे असा निर्णय घेतला होता. पण आपण त्या कालावधीत परिस्थितीचा पूर्णपणे आढावा घेऊन सुजय विखे आमदार झाला नाही तरी चालेल पण आपण आपल्या छोट्या भावाला अमोल खताळला आमदार करू शकलो, हा मनाचा मोठेपणा प्रत्येकाने दाखवला पाहिजे. मला पदाची अपेक्षा नाही, एखाद्या मंत्र्याने, आमदाराने, खासदाराने एवढ्या रात्री एवढी सभा घेऊन दाखवावी. एवढी गर्दी एका माजी खासदाराच्या सभेला होते, काय करता पदाला? पद एक निमित्त असतं पद गेल्यानंतर माणसाची किंमत जर टिकून राहिली तर समजून घ्यायचं. तो माणूस त्या पदापेक्षा मोठा आहे आणि हे आपण करून दाखवले आहे.

खासदारकी गेली आपण खचलो नाही. ताकतीने उभे राहिलो, गावागावात जाऊन लोकांशी संपर्क साधला. संगमनेर तालुक्यातील जनतेने ४० वर्ष विखे परिवारावर प्रेम केले आहे. नगर दक्षिणमध्ये लाटेमध्ये कोणीतरी खासदार होऊन गेलं. आज कोण विचारत असा टोला खा. निलेश लंके यांचे नाव न घेता डॉ. सुजय विखे यांनी लगावतांनाच आज नगर दक्षिणची काय परिस्थिती आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्ही संसद बंद पाडू बोलणाऱ्यांना संसदेत दोन मिनिटे बोलू दिले जात नाही, अशी अवस्था या खासदाराची असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ज्यांनी युवा मंच स्थापन करण्याची संकल्पना मांडली व ती यशस्वी करून दाखवली असे भाजपा बूथ प्रमुख सोमनाथ डोळे, गंगाधर व्यवहारे, डॉ. रमेश वाणी, प्रा. वनिता नाईकवाडी, स्वप्निल पाटील, राहुल वाणी, जालिंदर वाणी, राजेंद्र वाणी, दादासाहेब वाणी, अनिल बर्डे, वाल्मीक शिंदे, मदन म्हंकाळे, मंगेश व्यवहारे, जयदीप तोंडे, महेश भवर, विजय वाणी, अनिल वाणी, किरण वाणी, संजय वाणी, विकास वाणी, गंगाधर वाणी, बाळासाहेब डोळे, राहुरीचे माजी सभापती भीमराज हारदे, पद्मश्री कारखान्याचे संचालक विजय म्हसे, सरपंच सतीश जोशी, भारत गीते, प्रा. कान्हु गीते, शरद ढमक, माजी सरपंच अशोक जोशी, जनसेवा युवा मंचचे सर्व सदस्य, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन सचिन आव्हाड यांनी केले.

# धर्म हा मानवतेची शिकवण देणारा

## मा. आ. सुधीर तांबे; प्रेषित महंमद पैगंबर ग्रंथाचे वितरण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : देशातील प्रत्येक नागरिकांनी आपापल्या धर्माप्रमाणे आचरण केल्यास सर्वत्र शांतता निर्माण होईल. धर्म हा मानवतेची शिकवण देत असतो. राजकीय किंवा व्यक्तिगत स्वार्थासाठी सामाजिक धार्मिक विष पेरणारी लोक समाजात वाढत आहेत. सामान्य माणसाच्या मनात कुठलीही द्वेष भावना नसते. ते माणुसकीच्या नात्याने एकोप्याने जगतात. प्रत्येकाने किमान आपल्या धर्माचे पालन केले तरी सामाजिक सलोखा टिकेल, असे आवाहन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

येथील शासकीय विश्रामगृहात मानवता संदेश फाउंडेशन व जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या वतीने इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित महंमद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवन कार्याचा परिचय करून देणाऱ्या ग्रंथाचे वितरण शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी डॉ. तांबे बोलत होते. नॅब संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ भागचंद चुडीवाल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

आमदार हेमंत ओगले, माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या समन्वयक मंजुश्री मुरकुटे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम शिखरे, विधी व न्याय खात्याचे माजी उपसचिव बाळासाहेब देशमुख, गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, राज्य क्रीडा परिषदेचे माजी सदस्य लकी सेठी, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रणजीत श्रीगोड, पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक गाडेकर व महेश रक्ताटे, पत्रकार करण नवले, माजी उपनगराध्यक्ष अंजुमभाई शेख, मुख्तारभाई शहा, रईस जहागीरदार, अँकर असोसिएशनचे अध्यक्ष आदिनाथ जोशी, अशोक उपाध्ये, डॉ.निशिकांत चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार मारूतराव राशिनकर, सचिन उघडे, प्रदीप आहेर आदि व्यासपीठावर यावेळी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ चुडीवाल, अनुराधा आदिक, मंजुश्री मुरकुटे, करण ससाणे, परिवहन अधिकारी अनंता जोशी,शहर काजी सय्यद अकबरअली यांची भाषणे झाली. प्रारंभी आयोजकांच्या वतीने मानवता संदेश फाउंडेशनचे अध्यक्ष सलीमखान पठाण यांनी प्रास्ताविकातून उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. विधीज्ञ समीन बागवान यांनी सूत्रसंचालन केले.

### शांततेसाठी एकत्र यावे : आमदार ओगले

आमदार हेमंत ओगले यांनी सांगितले की, प्रत्येकाचे राजकीय विचार वेगळे असले तरी श्रीरामपूरच्या शांततेसाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. कारण शांतते शिवाय कुठलाही विकास शक्य नसतो. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचे मानवता संदेश फाउंडेशनचे कार्य उल्लेखनीय आहे.

## डॉ. संदीप नेहे यांना पीएचडी पदवी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : तालुक्यातील सावरगाव तळ येथील एका शेतकरी कुटुंबातील प्रा. डॉ. संदीप संपत नेहे यांना नुकतीच श्रीनिवास विद्यापीठ बेंगलोर कर्नाटक यांच्याकडून मेकॅनिकल विषयात पीएचडी नंतरची (पोस्ट पीएचडी) ही पदवी बहाल करण्यात आली तसेच त्यांचा संशोधक पुरस्कार देऊ नये गौरव करण्यात आला.

शेतकरी कुटुंबातील संदीप नेहे यांनी अत्यंत कष्टातून आपले इंजीनियरिंगचे शिक्षण पूर्ण केले. ते सध्या जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट या इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. पोस्ट पीएचडी करण्यासाठी श्रीनिवास विद्यापीठ मेंगलोर कर्नाटक या ठिकाणी प्रस्ताव दाखल केला होता. त्या विद्यापिठाने त्यांना नुकतीच पोस्ट पीएचडी ही पदवी बहाल केली आहे. त्यांना डॉ. बी. एम. परबीन यांनी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

## महिलेचा पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सुपा पोलीस ठाण्याच्या आवारात एका महिलेने अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. स्वाती प्रकाश दरेकर (वय ३५, मूळ रा. दरेकर वस्ती, न्हावरा, ता. शिरूर जि. पुणे, हल्ली रा. सुपा, ता. पारनेर) असे या महिलेचे नाव असून, या घटनेत ती गंभीर जखमी झाली आहे. तिला उपचारासाठी पुण्याच्या ससून रूग्णालयात हलविण्यात आले आहे. बाळासाहेब मासाळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून स्वाती दरेकर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका गुन्ह्यासंदर्भात स्वाती या २ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुपा पोलीस ठाण्यात आल्या होत्या. नाजूक प्रकरणाच्या संदर्भात त्या तणावाखाली असल्याने त्यांनी पोलीस ठाणे आवारात स्वतःच्या अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना पाहून पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी तसेच तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांनी त्यांच्याकडे धाव घेत आग विझवली.

मात्र तोपर्यंत त्या मोठ्या प्रमाणात भाजून जखमी झाल्या होत्या. त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पुण्याच्या ससून रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात आवारात आत्महत्येचा प्रयत्न केला म्हणून स्वाती दरेकर यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

## भारदे साक्षरता मंडळाच्यावतीने व्याख्यानमाला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळाच्यावतीने दि. ८ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर या कालावधीत गंगा-मृणालिनी स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. रमेश भारदे व निमंत्रक हरीश भारदे यांनी दिली. रोज सकाळी साडे दहा ते बारा या वेळेत पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूलमधील रावसाहेब पटवर्धन सभागृहात व्याख्यान होणार आहेत. दि. ८ सप्टेंबरला यजुर्वेंद्र महाजन (स्पर्धा परीक्षेवर बोलू काही), दि. ९ सप्टेंबरला प्रवीण दवणे (दीपस्तंभ, मनातले... जनातले), दि. १० सप्टेंबरला गणेश शिंदे (मोगरा फुलला), दि. ११ सप्टेंबरला डॉ. अंजली धानोरकर (झपाटले पण ते जाणतेपण), दि. १२ सप्टेंबरला मुक्ता चैतन्य (मोबाईलचे व्यसन आणि आव्हाने), दि. १३ सप्टेंबरला पत्रकार राजीव खांडेकर यांचे समाज माध्यमे व आजची पत्रकारिता या विषयावर व्याख्यान होणार आहे. सर्वांनी व्याख्यानमालेचा लाभघ्यावा, असे आवाहन विश्वस्त रागिनी भारदे यांनी केले आहे.

# पुणे-नाशिक महामार्गावर साईडपट्ट्यांना टाकली माती

## अपघाताचा धोका, वाहनचालकांसह नागरिक संतप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग हा राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग असून या मार्गावर दिवस-रात्र प्रचंड वाहतूक सुरू असते. या महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू असून टप्प्याटप्प्याने हे काम पूर्ण केले जात आहे. मात्र, आता हिवरगाव पावसा टोलनाका ते चंदनापुरी घाटापर्यंतच्या कामामध्ये गंभीर हलगर्जीपणा समोर आला आहे. संबंधित ठेकेदार कंपनीकडून साईडपट्यांना मुरुमाचा भरावा न टाकता उकरलेल्या रस्त्याचा भराव व माती टाकून साइड रोड तयार केल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे वाहनचालक व परिसरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.



पुणे व नाशिक या दोन प्रमुख महानगरांना जोडणारा या राष्ट्रीय मार्गावर सध्याच्या स्थितीत ठिकठिकाणी सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्यामुळे अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक केली जात आहे. स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी या प्रकाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. ठेकेदार कंपनी केवळ नफा कमावण्याच्या उद्देशाने काम करत आहे. सुरक्षेचे नियम, दर्जा आणि सार्वजनिक हित याकडे त्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. पावसाळ्याच्या काळात माती टाकून तयार केलेला तात्पुरता साईडपट्टी कुठल्याही क्षणी दबू शकतात. त्यामुळे तत्काळ मुरुमाचा मजबूत भराव टाकण्यात यावा, अशी मागणी नागरिक व वाहनधारकांनी केली आहे.

### सुचनांना ठेकेदाराकडून हारताळ

हिवरगाव पावसा टोलनाका ते चंदनापुरी घाट या भागात हे नियम सपशेल धाब्यावर बसवण्यात आले आहेत. उकरलेल्या रस्त्याचा कचरा, भराव व माती टाकून केवळ दिखाऊ पद्धतीने रस्ता तयार करण्यात आला आहे. परिणामी पावसाळा अजून सुरू असताना पावसाचे पाणी साचल्यास हा रस्ता पूर्णपणे खचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या हलगर्जीपणामुळे केवळ रस्त्याचे नुकसानच नाही तर वाहनधारकांचा जीव धोक्यात येणार आहे.

# मिरजगावच्या उपसरपंचपदी भाजपचे लहु वतारे

## सभापती शिंदेंचा आ. रोहित पवारांना धक्का



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : तालुक्यातील मिरजगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक मंगळवारी (दि.२) पार पडली. यामध्ये भाजपचे लहू वतारे विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) सागर पवळ यांचा दहा विरुद्ध सात मतांनी पराभव केला.

विधानसभा निवडणुकीपूर्वी शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये डॉ. गोरे राम शिंदे यांना सोडून रोहित पवार यांच्यासोबत गेले होते. ते आता पुन्हा सभापती राम शिंदे यांच्या गटात दाखल झाले आहेत. अवघ्या पाच महिन्यांवरच मिरजगाव ग्रामपंचायतची निवडणूक आलेली असताना, डॉ. गोरे यांना कोणता शब्द सभापती शिंदे यांनी दिला आहे. त्यामुळे त्यांनी रोहित पवार यांची साथ सोडून राम शिंदे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला याची जोरदार चर्चा सध्या मिरजगावमध्ये आहे.

मिरजगाव ग्रामपंचायतमध्ये १७ सदस्य असून उपसरपंच आबासाहेब वीर यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने जागा रिक्त होती. या पदासाठी सभापती शिंदे गटाचे लहू वतारे इच्छुक होते.

विद्यमान सरपंच नितीन खेतमाळीस गटाकडून वतारे यांनी मंगळवारी सकाळी दहा वाजता अर्ज दाखल केला. तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादीचे सागर पवळ यांनी उपसरपंच पदासाठी अर्ज दाखल केला. त्यामुळे या निवडणुकीत चुरस निर्माण झाली होती.

या लढतीमध्ये वतारे यांनी पवळ यांचा दहा विरुद्ध सात मतांनी पराभव केला.

डॉ. पंढरीनाथ गोरे व त्यांच्या पत्नी डॉ. शुभांगी गोरे या दोघांची मते फुटली. त्यांनी भाजपचे उमेदवार लहू वतारे यांना मते दिल्यामुळे सागर पवळ यांचा पराभव झाला.

# गावठी कट्टा घेवून फिरणारा जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : गावठी कट्टा घेऊन फिरणाऱ्याला जामखेड पोलिसांनी पकडले. अजित लालासाहेब उबाळे असे त्याचे नाव आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी, जामखेड तालुक्यातील चौंडी येथील अजित उबाळे चापडगाव रोडवर हातात गावठी कटटा घेवून फिरत असल्याची माहिती जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाली.

त्यानूसार त्यांनी नेमलेले पथक चौंडी गावात शोध घेत असताना अजित उबाळे चौंडी-चापडगाव रोडवर सिना नदीच्या पुलाजवळ पथकाला दिसला. पथकास पाहून तो पळुन गेला. याबाबत दि.०२ सप्टेंबर रोजी अजित उबाळे विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीचा शोध घेत असताना तो पाटोदा गावचे शिवारात येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानूसार सहायक पोलिस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, देविदास पळसे, कुलदिप घोळवे यांनी सापळा रचून आरोपीस गावठी कटटयासह ताब्यात घेतले.



ही कारवाई पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उप विभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, नंदकुमार सोनवलकर, देविदास पळसे, कुलदिप घोळवे तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे नितीन शिंदे यांनी केली आहे.

## बेलापूर सोसायटीच्या चेअरमनपदी नवले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : बेलापूर बुद्रुक येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी किशोर शंकरराव नवले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.संस्थेचे दिवंगत चेअरमन विलासनाना मेहेत्रे यांची पंधरा दिवसांपूर्वी संस्थेच्या चेअरमन पदी निवड करण्यात आली होती. परंतु त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्या रिक्त जागी किशोर नवले यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. कुठल्याही गाजावाजा न करता व हारतुरे न घेता साधेपणाने ही निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून रवींद्र जाधव व संस्थेचे सचिव विजय खंडागळे यांनी काम पाहिले.यावेळी आयोजित पदाधिकारी निवडीच्या बैठकीला संस्थेचे माजी चेअरमन, ज्येष्ठ संचालक व श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती सुधीर पाटील नवले, जनता आघाडीचे अध्यक्ष रवींद्र खटोड, ज्येष्ठ संचालक अरुण पाटील नाईक, माजी सरपंच भरत साळुंके, विद्यमान व्हा. चेअरमन अन्तोन अमोलिक, शेषराव पवार, शिवाजी पाटील वाबळे, राजेंद्र सातभाई, अशोक कुहे, विश्वनाथ गवते, पंडितराव बोंबले, सविता मेहेत्रे हे संचालक उपस्थित होते.

## जिजामाता महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भेंडा** : येथील श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयातील संगणक शास्त्र विभागातील १० विद्यार्थ्यांची पुणे, हैदराबाद, नाशिक, अहिल्यानगर, मुंबई, अहमदाबाद येथील वेगवेगळ्या आयटी कंपनी मध्ये नोकरी करिता निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये तन्मय तिडके, नकुल वाघमारे, नयन गवारे, मदन घोडेचोर, प्रतिक मुंगसे, अमोल उगले, प्रिया बानगुडे, सोमनाथ गोरे, प्रसाद पवार, बाळासाहेब माळवदे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट विभाग कार्यरत आहे. दरवर्षी वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांना बोलावून थेट मुलाखतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधीउपलब्ध करून दिल्या जातात. संगणकशास्त्र विभागातील विभाग प्रमुख प्रा. हरिष घोलप, प्रा. किरण निकम, प्रा. देविदास सोनवणे, प्रा. अमोल कमानदार, प्रा. आदिनाथ उगले, प्रा. पल्लवी लांडे, प्रा. सरिता नवथर, प्रा. अक्षदा काळे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील, विश्वस्त माजी आ. पांडुरंग अभंग, ॲड. देसाई देशमुख, डॉ. क्षितीज घुले पाटील, सचिव अनिल शेवाळे, सहसचिव रवींद्र मोटे, विश्वस्त प्रा. डॉ. नारायण म्हस्के, उपप्राचार्य डॉ. रमेश नवले यांनी अभिनंदन केले.

# निळवंडेचे पाणी मालुंजे पाझर तलावात

## डॉ. सुजय विखे, आ. अमोल खताळ यांच्या हस्ते पूजन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : तालुक्यातील मालुंजे येथे निळवंडे उजव्या कालव्याचे पाणी मालुंजे येथील पाझर तलावात दाखल झाले असून पाझर तलावातील पाण्याचे पूजन माजी खासदार आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील व आ. अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले.

संगमनेर तालुक्यातील कोळवाडे, अंभोरे, डिग्रस, मालुंजे, पानोडी या गावांमध्ये दुष्काळ पाचव्या टप्प्यात होता. या सर्व गावांमध्ये शासनाचे पाण्याचे टँकर सुरू होते. मात्र, राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून निळवंडे डावा आणि उजवा या दोन्ही कालव्यांचे काम पूर्ण होऊन या वर्षी सर्वप्रथम निळवंडे उजव्या कालव्याला पाणी आले. या भागातील जनतेची पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची टंचाई दूर झाली आहे.

निळवंडे उजव्या कालव्याचे पाणी मालुंजे गावच्या पाझर तलावात आले. त्यामुळे या भागातील टँकर बंद झाले असून परिसरातील महिलांच्या डोक्यावर असलेला हंडा खाली उतरला आहे. त्यामुळे परिसरातील महिला शेतकरी समाधानी झाले आहेत. जलसंपदामंत्री व पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. संगमनेर तालुक्यातील मालुंजे गावामध्ये पिण्याच्या पाण्याचा तुटवडा होता, त्यामुळे महिलांना दाही दिशा हंडाभर पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते पांडुरंग घुगे होते. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष गोकुळ दिघे, मालुंजेच्या सरपंच सुवर्णा घुगे, अनिल नागरे, सुरेश काळे, दिलीप वर्षे, जलसंपदाचे कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे, उपअभियंता शेवाळे उपस्थित होते.

### विखे व खताळ यांची मिरवणूक

अमोल खताळ यांच्या माध्यमातून या पाझर तलावात पाणी आले आहे. त्यामुळे परिसरातील सर्वसामान्य जनता आनंदित झाली आहे. निळवंडे उजव्या कालव्याचे पाणी मालुंजे पाझर तलावात सोडले असल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी ना. विखे पाटील, आ. खताळ व भाजपचे उपाध्यक्ष घुगे यांची सजविलेल्या गाडीतून ढोलताशाच्या गजरात संपूर्ण गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढली. तसेच दोघांचा क्रेनच्या साह्याने मोठा हार घालून सत्कार केला.

# सजावट स्पर्धेमुळे महिलांना प्रोत्साहन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : दरवर्षीप्रमाणे मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे यांच्या मार्गदर्शनाखाली गौरी गणपती सजावट स्पर्धेत अनेक महिलांनी सहभाग घेतला. घरी आलेल्या ज्येष्ठ गौरींचे स्वागत आकर्षक देखाव्यांनी केल्याची माहिती, माजी नगरसेविका स्नेहल केतन खोरे यांनी दिली.

स्नेहल खोरे म्हणाल्या, शहरात गणेशोत्सव काळात अनेक महिलांच्या घरी ज्येष्ठ गौरींचे आगमन होत असते. महिलांनी केलेल्या आकर्षक सजावटीस प्रोत्साहन मिळावे, म्हणून मोरया फाउंडेशनच्या माध्यमातून दरवर्षी प्रभागातील महिलांसाठी गौरी गणपती सजावट स्पर्धा घेतली जाते. ऑनलाईनच्या जगात परीक्षकांसह थेट महिलांच्या घरी जाऊन गौराई देखाव्यांचे परीक्षण करण्याचे वेगळेपण जपण्याचा मोरया फाउंडेशनचा प्रयत्न असल्याचे खोरे यांनी सांगितले.

### या महिलांना मिळाले पारितोषिके

यंदाच्या स्पर्धेत पहिला क्रमांक स्वप्नाली निलेश झिरंगे, मनिषा रामेश्वर रोडे यांचा दुसरा तर रेणुका राजेश राऊत यांनी तिसरा क्रमांक मिळविला. युक्ती शुभम चोथवे यांच्या गौराईला उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला. स्वतःच्या हाताने घरी तयार केलेल्या १२ जोतिर्लिंगचा देखावा मनमोहक होता. तर जेजुरीची प्रतिकृती साकारलेल्या गौरी सजावटीने सर्वांचे लक्ष वेधले.

# महावितरण कामगार व वीज ग्राहक यांच्यात महत्त्वाचा दुवा : आ. काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** पावसाळ्यात तांत्रिक बिघाड होतात, त्यामुळे अनेक वेळा वीज पुरवठा खंडीत होतो. जर कधी रात्रीची वेळ असेल तर अशा परिस्थितीत शहरी भाग असो वा ग्रामीण भाग त्या भागातील नागरीकांना खंडीत वीजपुरवठा कधी सुरु होईल याची नागरीक आतुरतेने वात पाहत असतात. अशा वेळी विद्युत विभागाचे तांत्रिक कामगार वेळप्रसंगी आपला जीव धोक्यात घालून वीज सेवा पूर्ववत करतात. त्यामुळे तांत्रिक कामगार महावितरण आणि वीज ग्राहक यांच्यामधील अत्यंत महत्वाचा दुवा आहे, असे प्रतिपादन आ. आशुतोष काळे केले आहे.

कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे येथे विद्युत क्षेत्र कामगार युनियनच्या ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार संघटनेच्या स्वमालकीच्या जागेवर एकता प्रतिष्ठाणच्या कार्यालयाचे उदघाटन तसेच तांत्रिक भवन व प्रशिक्षण केंद्राचे भूमिपूजन आ. काळेंच्या हस्ते पार पडले. तसेच आ. काळेंच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर व वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

आ. काळे पुढे म्हणाले की, तांत्रिक कामगारांचे वीज ग्राहकांशी दैनंदिन संबंध येत असतात. अडचणींच्या वेळी ऊन, वारा, पाऊस याचा विचार न करता विशेषतः पावसाळ्यात इमर्जन्सीमध्ये तांत्रिक कामगारांना चोवीस तास काम करावे लागते. महावितरणमध्ये मागील अकरा वर्षापासून तांत्रिक कामगारांची भरती करण्यात आलेली नसल्यामुळे कमी कर्मचाऱ्यांमध्ये काम करावे लागत असून कामगारांचा कामाचा लोड वाढलेला आहे. याची जाणीव महायुती शासनाला असून महायुती शासन हे सर्वसामान्य घटकांचा विचार करणारे शासन आहे.

त्याप्रमाणे तुमचे देखील प्रश्न महायुती शासन निश्चितपणे सोडविल असा विश्वास आ. काळे यांनी यावेळी व्यक्त केला. व सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान शिबिर व वृक्षारोपण आयोजित करून सामाजिक बांधिलकी जोपासल्याबद्दल विद्युत क्षेत्र कामगार संघटनेचे कौतुक केले.



### दिग्गज मान्यवर होते उपस्थित

परमपूज्य माताजी शारदानंदगिरीजी महाराज, खा. भाऊसाहेब वाकचौरे, राजेश परजणे, महावितरण संचालक राजेंद्र पवार, रवींद्र बाराई, शंकरराव चव्हाण, शरद होन, सरपंच किरण होन, उपसरपंच वसीम शेख, विलास चव्हाण, नारायण होन, रावसाहेब होन, डॉ. मुळे आदी उपस्थित होते.

# पत्रकारांच्या हस्ते मानाचा गणपतीची आरती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** शहरातील सदभावना आनंद सेवा मंडळाच्या मानाच्या गणपतीची दि. २ सप्टेंबर रात्रीची आरती पत्रकार अमिनभाई शेख, बाळासाहेब काकडे, माधव बनसुडे व रमेश गांधी यांच्या हस्ते करण्यात आली. मानाचा गणपती म्हणून नावलौकिक असलेल्या गणपतीची नवसाला पावणारा गणपती म्हणून ख्याती आहे. नागरिकांची या गणपतीवर श्रद्धा असुन गल्लीतील तीन मुस्लिम कुटुंब अनेक वर्षांपासून नवस कृतीसाठी पेढे व नारळ ठेवतात. यावेळी पत्रकारांनी मंडळाच्या सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष संतोष क्षीरसागर , कार्याध्यक्ष महावीर पटला, रसिक कटारिया, आनंद कटारिया, आनंद गांधी, दयानंद लोखंडे, गौतम पटवा, महेश अंबिलवादे, दीपक दळवी, अतुल मेहता, जय पलिवाल, सौरभ गुंदेच्या, लादेश कटारिया, गणेश क्षीरसागर, चंद्रकांत धोत्रे व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# 'दादा पाटील'चा क्रिकेट संघ तालुक्यात प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** रविशंकर विद्या मंदिर कर्जत येथे नुकत्याच संपन्न झालेल्या तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील वयोगटात दादा पाटील महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने कर्जत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेकरिता संघ पात्र ठरलेला आहे. सदर मुलांचा क्रिकेट संघ कर्जत तालुक्याचे प्रतिनिधित्व जिल्ह्याला करणार आहे.

या संघामध्ये श्वेतांक भोसले, रिफद पठाण, एफ अर्षद सय्यद, थोरात प्रणव, सुदर्शन सूर्यवंशी, साहिल काळे, बागल यशोधन, यश गलांडे, तनपुरे अभिषेक , पांडुळे दत्तात्रय, मांडगे श्रेयस, काळदाते अथर्व, शुभम लाहोर, सूरज गोरे, स्वप्नील धोंडे, राजवर्धन राणमळ हे खेळाडू सहभागी होते.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा. पवन कडू, प्रा. अशोक शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले .



### दिग्गज मान्यवराकडून शुभेच्छाचा वर्षाव

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य राजेंद्र फाळके, आ. रोहित पवार, अंबादास पिसाळ, राजेन्द्र निंबाळकर, बप्पाजी धांडे, प्राचार्य डॉ. संजय नगरकर आदींनी अभिनंदन केले.

# विद्यार्थ्यांनी बनवली मानवी साखळीतून गणपतीची प्रतिकृती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** किड्स किंग्डम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून गणपतीची भव्य प्रतिकृती बनवली असल्याने या विद्यार्थ्यांनी वाहवा मिळवली आहे.

सोनईच्या किड्स किंग्डम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे गणेशाची सुंदर प्रतिकृती साकारली. विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ही आकर्षक प्रतिकृती तयार केली. विद्यार्थ्यांच्या या सामूहिक प्रयत्नामुळे एक अनोखी आणि कलात्मक गणेश मूर्ती साकारली गेली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील एकजूट आणि कलात्मकता दिसून आली. ही प्रतिकृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. परिसरात प्रतिकृती कौतुकाचा विषय ठरली आहे. दरवर्षी या विद्यालयात वेगवेगळया प्रकारचा सामाजिक संदेश लोकांपर्यंत पोहचावा अशी आरास बनवत असते. यावर्षी किड्स किंग्डम अकॅडमी मध्ये ऑपरेशन सिंदूर याबाबत संदेश देणारी बाप्पाची आरास सज्ज केली आहे. ही आगळी-वेगळी आरास बघून पालकांनी व गावकऱ्यांनी कौतुक केले.



मानवी साखळी गणेश प्रतिकृती तयार करताना विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने काम केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि कलात्मक दृष्टिकोन वाढीस लागण्यास मदत झाली आहे.

**- किर्ती बंग, प्राचार्य**

# वैजापुरात जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## ५५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत; वैजापूर पोलीसात गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर शहर व परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर वैजापूर पोलिसांनी छापा टाकून पत्त्यावर पैसे लावून जुगार खेळणाऱ्या तेरा जणांविरुध्द कारवाई केली. या कारवाईत तब्बल ५५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलिसांच्या या कारवाईमुळे जुगाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सोमवारी रात्री बारा वाजलेच्या सुमारास पोलिसांनी शिवराई रस्त्यावर रामवाडी वस्तीजवळील मारुती मंदिरापाशी छापा टाकला. त्यावेळी गायकवाडवाडी वस्ती येथील भरत पेहरकर, संतोष गायकवाड, पोपट पवार, दत्तू चापेकर, गणेश राजपूत हे पाच जण पत्त्यावर जुगार खेळताना आढळून आले.

पोलिसांनी त्यांच्या अंगझडतीत रोख दहा हजार २५० व जुगाराचे साहित्य जप्त केले. तर दुसऱ्या कारवाईत पोलिसांनी शहरातील शास्त्रीनगर परिसरात असलेल्या दत्त मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या जागेवर रात्री दीड वाजता छापा टाकला. यावेळी वैजापूर शहरातील आठ जुगाऱ्यांना ताब्यात घेऊन पोलिसांनी त्यांच्याकडून रोख रक्कम व पाच मोबाईल असा ४४ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मंगेश त्रिभुवन, प्रशांत सिरसागर, अमोल बर्डे, सम्राट राजपूत, महेश भालेराव, सागर राजपूत, गणेश राजपूत व मोहित संचेती अशी जुगाऱ्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक युवराज पाडळे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुध्द वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# संगमनेरात मराठा आरक्षणाचा महायुतीकडून जल्लोष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** मराठा समाजाच्या मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या. त्यामुळे संगमनेर बसस्थानकावर सकल मराठा समाज आणि महायुतीच्यावतीने फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला.

मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, या प्रमुख मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर पाच दिवसापासून उपोषण सुरू होते. राज्य शासनाने मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य केल्या. त्यामुळे जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले आणि आरक्षणाची लढाई जिंकली, हे वृत्त समजताच सकल मराठा समाज आणि महायुतीच्यावतीने संगमनेर बसस्थानकाजवळ एक मराठा लाख मराठा अशा घोषणांनी बसस्थानक परिसर दणाणून गेला होता.

यावेळी ज्येष्ठ नेते वसंतराव गुंजाळ, भाजप तालुका अध्यक्ष गुलाब भोसले, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, शिवसेनेचे शहर प्रमुख दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, उपजिल्हा प्रमुख रमेश काळे, दिपाली वाव्हळ, रेखा गलांडे, सौरभ देशमुख, सिताराम पानसरे, सार्थक शेवाळे, वरद बागुल, शशांक नामन, अक्षय तिलक, भैय्या सातपुते यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.




# सांगली अधिवेशनासाठी हजारो कार्यकर्ते जाणार : संसारे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** भारतीय कर्मचारी संघ व भारतीय स्वाभिमानी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी (दि. ७) रोजी सांगली येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात होणाऱ्या राज्य अधिवेशनाला अहिल्यानगर जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते जाणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष संजय संसारे यांनी दिली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे कि, आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक यांच्या २३४ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र व कर्नाटक राज्याचे हे पहिले संयुक्त राज्य अधिवेशन होत आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन लिंगायत धर्मगुरू प. पू. कोरनेश्वर स्वामी यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष डी. आर. ओहोळ हे राहणार आहेत. सकाळी १०.३० वाजता सुरू होणाऱ्या या अधिवेशनात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कर्मचारी आदी महत्त्वाच्या विषयावर विशेष चर्चा होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची नोंदणी झाली असून, हजारो कार्यकर्ते राज्य अधिवेशनासाठी रवाना होणार आहेत. संघटनेच्या इतिहासातील हे अधिवेशन ऐतिहासिक ठरणार असल्याचा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला असून यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याची माहिती भारतीय कर्मचारी संघाचे राज्याध्यक्ष रमेश मकासरे, जिल्हाध्यक्ष राज दिवेकर, शिवाजी भोसले, गणपतराव मोरे यांनी दिली.

# कर्जतमध्ये लाडक्या गणरायाचे विसर्जन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत शहरातील मोटार चालक-मालक संघटना यांच्यावतीने लाडक्या गणरायाचे विसर्जन काल पारंपारिक पद्धतीने वाजत-गाजत उत्साहात पार पडले.

शहरातील प्रमुख मार्गावरून गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. नटराज बँडच्या मंगलधून आणि गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशा जल्लोषात घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. भक्तांच्या टाळ्या, फुलांचा वर्षाव आणि पारंपारिक नृत्य यांच्या सोबतीने विसर्जनाची मिरवणूक रंगतदार झाली.

या सोहळ्याला माजी जि. प. सदस्य प्रविण घुले, बांधकाम सभापती भास्कर भैलुमे, भाऊसाहेब तोरडमल, गणेश जेवरे, अफरोज पठाण, मच्छिंद्र अनारसे, रुषिकेश पवार, रज्जाक झारेकरी आदी मान्यवरांसह मोटार चालक-मालक संघटनेचे पदाधिकारी व भास्कर भैलुमे मित्र मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणेशोत्सवातील आनंदोत्सव विसर्जन सोहळ्यात एकत्र आला आणि भक्तिमय वातावरणात लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला.



# संगमनेरातील जनतेचे आरोग्य सुखी-समाधानी ठेवा

## आ. खताळांचे गणरायाकडे साकडे; संगमनेरातील गणेश मंडळाच्या गणरायाची महाआरती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील सर्व जनतेचे आरोग्य सुखी समाधानी ठेवा त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचे विघ्न येऊ देऊ नका. तसेच मला विकास कामे पूर्ण करण्याची शक्ती द्या, असे साकडे आ. अमोल खताळ यांनी गणपती बाप्पाच्या चरणी घातले.

संगमनेर शहरातील शमी महागणपती राजमुद्रा प्रतिष्ठान पारिजात कॉलनी मित्र मंडळ, नवनिर्माण मित्र मंडळ, संग्राम मित्र मंडळ, मराठा मित्र मंडळ, कुंदन मित्र मंडळ, श्रीराम तालीम मित्र मंडळ, बाजारपेठ व्यापारी मित्र मंडळ, शिवसेना शाखा कुंभारआळा मित्र मंडळ, सुतार गल्ली मित्र मंडळ, रामनगर मित्र मंडळ, शिवाजीनगर मित्र मंडळ, स्वराज्य मित्र मंडळ, गणेश मित्र मंडळ, टेंभी नाका तरुण मित्र मंडळ, वक्रतुंड प्रतिष्ठान पार्क मित्र मंडळ, शिवाजीनगर तरुण मित्र मंडळ, साईनगर हिंदू तरुण मित्र मंडळ, जय बजरंग वडार मित्र मंडळ या गणेश मंडळासह शहरातील विविध गणेश मंडळांच्या गणरायाची महाआरती आ. अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, राहुल भोईर, शशांक नामन, वरद बागुल, शिवसेनेचे शहरप्रमुख दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, सौरभ देशमुख, अक्षय वर्पे, सार्थक शेवाळे, शम्मी गणपती कमिटीचे सुनील गाडेकर, संजय पाडेकर, संतोष निवासकर, कैलास अभंग यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी कार्यकर्ते गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अशोकनगर फाटा-कारखाना रस्ता दुरुस्त करा : डांगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील अशोकनगर फाटा ते अशोकनगर कारखाना रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून जोशी वस्ती तसेच कारखाना परिसर या ठिकाणी नागरिकांना ये-जा करणे अवघड झाले असून अशोकनगर फाटा-कारखाना रस्ता त्वरित दुरुस्त करा, अशी मागणी जागतिक मानवाधिकार सुरक्षा फेडरेशन तालुकाध्यक्ष बाबासाहेब डांगे यांनी केली आहे.

या रस्त्यांनी वयोवृद्ध नागरिक, शाळा, कॉलेज, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच वैद्यकीय उपचारासाठी नागरिक महिलांना ये-जा मोठे कठीण झालेले आहे. या संदर्भात डांगे यांनी आ. हेमंत ओगले यांना संपर्क करून आमदार संपर्क कार्यालयातील संपर्क अधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे.

याबाबत त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्याची कठीण परिस्थिती विषयी माहिती दिलेली आहे. सदर प्रश्न लोकप्रतिनिधी यांनी तात्काळ लक्ष घालून नागरिकांना योग्य न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.



# पाय गमावले, जिद्द नाही



आजची यशोगाथा अशा एका व्यक्तीची आहे ज्याने बालपणी दोन्ही पाय गमावूनही जीवनात कधीच हार मानली नाही. 'जेईई डव्हान्स्ड' परीक्षा उत्तीर्ण केली आणि 'आयआयटी' मद्रासमध्ये शिक्षण घेतल्यानंतर आता तो गुगल कंपनीत काम करत आहे. नागा नरेश असे या तरुणाचे नाव असून त्याची कथा अत्यंत प्रेरणादायी आहे. एखाद्या व्यक्तीमध्ये काहीतरी करण्याची जिद्द असेल तर तो काहीही करू शकतो. नागा नरेशने आपल्या उदाहरणातून हे दाखवून दिले आहे. त्याचा जन्म गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या आंध्र प्रदेशातील टिप्पररू या छोट्याशा गावात झाला. त्याचे वडील ड्रायव्हर आणि आई गृहिणी असून दोघेही शिकलेले नव्हते. कुटुंबाचा खर्च नीट चालावा एवढीच त्यांची इच्छा होती. अशाप्रकारे गरिबी आणि खडतर आयुष्य जगत असतानाच नागा नरेशला अपघात झाला आणि दोन्ही पाय गमवावे लागले. नागा नरेश सांगतो की, अपघातानंतर त्याला एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. पण आई-वडिलांकडे पैसे नसल्यामुळे तेथे उपचार करण्यास नकार देण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी त्याला सरकारी रुग्णालयात नेले. तिथे डॉक्टरांना त्याचे दोन्ही पाय कापावे लागले. या घटनेने नागा नरेशचे आयुष्य कायमचे व्हीलचेअरवर बंदिस्त झाले.

**अपंगात्वर मात, 'जेईई'त यश**

अपंग झालेला नागा नरेश सुरुवातीपासून अभ्यासात चांगला होता. पण गरिबीमुळे त्याला शाळा सोडावी लागली. नंतर त्याचे कुटुंब तनुकू येथे गेले. तिथे त्याला मिशनरी शाळेत दाखल करण्यात आले. शारीरिकदृष्ट्या अपंग असूनही नागा नरेश अभ्यासात चांगली कामगिरी करत राहिला आणि त्याला मित्रांकडूनही चांगले सहकार्य मिळत गेले. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने 'आयआयटी-जेईई' परीक्षेसाठी कठोर तयारी केली आणि उत्तीर्णही झाला. ही देशातील

**अचिव्हर**

सर्वात कठीण परीक्षांपैकी एक असल्याचे आपण जाणतो. या परीक्षेत त्याने ९९२ वा क्रमांक पटकावला तर अपंग गटात त्याला चौथा क्रमांक मिळाला.

**'आयआयटी'त प्रवेश**

'जेईई ॲडव्हान्स' पास केल्यानंतर नागा नरेशला 'आयआयटी' मद्रास येथे बी.टेक. मध्ये प्रवेश मिळाला. एका ट्रेनमध्ये नागा नरेशची सुंदर नावाच्या व्यक्तीशी भेट झाली. त्याने त्याच्याकडून वसतिगृहाची फी घेण्याचा आग्रह धरला. खेरीज त्याच्यावर उपचार करणाऱ्या रुग्णालयानेही कॉलेजचे शिक्षण करण्यासाठी मोठी मदत केली. पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नागा नरेशला देशातील तसेच जगातील अनेक मोठ्या कंपन्यांकडून चांगल्या ऑफर मिळाल्या. त्याने 'गूगल' मध्ये सॉफ्टवेअर अभियंता म्हणून कार्यरत होण्याचा निर्णय घेतला. त्याच्या पुढील प्रवासाला अनंत शुभेच्छा.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

जिंदगी यूँही बहुत कम है
मोहब्बत के लिए,
फिर एक दुसरे से रूठकर
वक्त गँवाने की क्या जरूरत है।

नहीं बसती किसी और की सूरत
अब इन आंखो में,
काश की हमने तुझे,
इतने गौर से ना देखा होता।

काम ऐसा करो की
फेसबुकही नहीं,
जिंदगी में भी लाईक
मिले।



# संयुक्त राष्ट्रात काम करायचे? मग हे करा

'युनायटेड नेशन्स'शी संबंधित प्रतिष्ठित संस्थेत काम करण्याचे स्वप्न पाहत असाल तर युनेस्को (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन) एक उत्तम संधी देत आहे. अलिकडेच इथे पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. तिथे जागतिक स्तरावर काम करण्याचा अनुभव मिळू शकेल. या इंटर्नशिपमुळे कौशल्य विकासच होणार नाही, तर नेटवर्किंग आणि करिअर वाढीसाठीदेखील मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

**कोण करू शकतो अर्ज?**

✻ पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. किंवा समकक्ष अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

✻ गेल्या १२ महिन्यांत पदव्युत्तर पदवी किंवा पीएच. डी. पूर्ण केलेले उमेदवारही पात्र आहेत.

पदवी अभ्यासक्रमात प्रवेश न घेतलेले पदवीधारक अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**वयोमर्यादा:** उमेदवाराचे किमान वय २० वर्ष असावे.

सचिवीय/ तांत्रिक किंवा व्यावसायिक असाइनमेंटसाठी अर्ज करणारे उमेदवार संबंधित संस्थेच्या अंतिम वर्षात असावेत किंवा नुकतेच पदवी पूर्ण केलेले असावेत.

**इंटर्नशिपचा कालावधी**

किमान: १ महिने

जास्तीत जास्त: ६ महिने

अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांनी आपला संपर्क तपशील सहा महिन्यांसाठी वैध राहील याची खात्री करणे आवश्यक आहे.

**भाषा**

अर्ज इंग्रजी किंवा फ्रेंच भाषेत भरणे बंधनकारक आहे.

कागदपत्रे इंग्रजी किंवा फ्रेंचभाषेत नसतील तर अनौपचारिक भाषांतर सादर करावे लागेल.

**निवड प्रक्रिया**

व्यवस्थापक निवड झालेल्या उमेदवारांशी थेट संपर्क साधेल. सहा महिने उत्तर न मिळण्याचा अर्थ निवड झाली नाही, असा घ्यावा.

**कोणत्या विभागात मिळणार इंटर्नशिप?**

**करीअर ग्रोथ**

या इंटर्नशिप प्रोग्रामसाठी अर्ज करू इच्छिणारे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत खालील विभागांकडे अर्ज करू शकतात. गव्हर्निंग बॉडी, डायरेक्टर ऑफ कम्युनिकेशन अँड इन्फॉर्मेशन सेक्टर, एज्युकेशन सेक्टर, कल्चर सेक्टर, ब्यूरो ऑफ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, इंटरगव्हर्नमेंटल ओशनोग्राफिक कमिशन, कम्युनिकेशन अँड पब्लिक एंगेजमेंट, नॅचरल सायन्स सेक्टर, डिजिटल बिझनेस सोल्यूशन्स

**अर्ज कसा करायचा?**

युनेस्कोच्या अधिकृत संकेतस्थळावर जा. मागितलेले सर्व आवश्यक शैक्षणिक आणि वैयक्तिक तपशील भरा.

# उन्हाळ्यातील आरामासाठी...



दोस्तांनो, कपाटात ठेवलेल्या शॉर्टस बाहेर काढण्याचे हेच दिवस आहेत. उन्हाळ्यात मोकळेढाकळे कपडे घालावे लागतात. त्यामुळे या काळात कॅज्युअल ऑकेजनला शॉर्टस आणि टी-शर्ट हा बेस्ट ड्रेस ठरेल. तुमच्याकडे शॉर्टस नसतील तर विकत घ्या. उन्हाळ्यात भटकंती करणार असाल तर शॉर्टसना पर्याय नाही. मित्रमैत्रिणींसोबत कॅज्युअल आउटिंग असो किंवा घरात आराम करायचा असो, शॉर्टस आणि टी-शर्ट इतका आरामदायी पेहराव तुम्हाला शोधूनही सापडणार नाही. हटके प्रिंट्स आणि रंग बिनधास्त कॅरी करणाऱ्या मुलांसाठी शॉर्टसचे असंख्य पर्याय बाजारात उपलब्ध आहेत.

**फॅशन पॅशन**

अत्यंत आकर्षक रंगसंगती आणि प्रिंट्स असणाऱ्या शॉर्टस मिळत असल्या तरी उन्हाळ्यात तुमच्याकडे पांढरी शॉर्टस असणं गरजेचं आहे. उन्हाळ्यात थंडावा देणाऱ्या पांढऱ्या रंगाची चलती असते. म्हणूनच या दिवसात पांढरे कपडे घातल्याने तुम्हाला आरामदायी वाटतं. तसंच पांढऱ्यावर कोणत्याही रंगाचा टी शर्ट शोभून दिसतो. तुम्ही फ्लोरल शर्टही त्यावर घालू शकता. लाल, निळा, हिरवा, पिवळा या रंगाच्या शॉर्टसही छान दिसतात.

## टेक अपडेटस्

### 'विवो' देणार 'ॲपल' आणि 'सॅमसंग'ला टक्कर




चिनी कंपनी 'विवो'ने हेडसेटच्या बाबतीत 'ॲपल' आणि 'सॅमसंग'ला टक्कर देण्यासाठी कंबर कसली आहे. कंपनीने चीनमध्ये आयोजित एका कार्यक्रमात आपल्या 'विवो व्हिजन' ची झलक दाखवली आहे. कंपनीने सांगितले, की सध्या ते 'रोबोटिक्स ॲप्स'च्या संगणकीय क्षमता मजबूत करण्यावर काम करत असून व्हिजन हेडसेट त्याचाच एक भाग आहे. या डिव्हाईसची रचना स्कीइंगसाठी वापरल्या जाणाऱ्या गॉगल्ससारखी आहे. संवर्धित वास्तव आणि आभासी वास्तव सक्षम करण्यासाठी त्यावर अनेक सेन्सर लावण्यात आले आहेत. फ्रेमच्या खाली दोन सेन्सर आहेत. ते हात आणि बोटांच्या जेश्चर ट्रॅकिंगसाठी काम करतील. दीर्घकाळचा वापर आरामदायी करण्यासाठी हेडबँडमध्ये पॅड लावण्यात आला आहे. मात्र हे 'स्टँडअलोन युनिट' म्हणून काम करेल वा त्याला 'वायर्ड कनेक्शन' प्रणालीची आवश्यकता असेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## टेक टॉक

### इटलीत 'चॅटजीपीटी'वर बंदी



'चॅटजीपीटी' ने जगभर खळबळ माजवली आहे. अनेक लोक 'चॅटजीपीटी' चा आधार घेत काम सोपे करत आहेत, तर अनेकांना याची भीती वाटते. लोकांना भीती वाटते, की 'एआय' मानवावर वर्चस्व गाजवू शकते. यासोबतच अनेक लोक प्रायव्हसीशी संबंधित समस्याही सांगत आहेत. अलीकडेच इटलीमधील डेटा संरक्षण प्राधिकरणाने गोपनीयतेच्या समस्येचा हवाला देत ओपन 'एआय'च्या व्हायरल एआय चॅटबॉट चॅटजीपीटीवर बंदी घातली आहे. 'ओपन एआय' वापरकर्त्यांना इतर वापरकर्त्यांच्या चॅटबॉट संभाषणांची शीर्षके पाहण्याची परवानगी देते. ही बाब निश्चितच गोपनीयतेसाठी चांगले नाही. तथापि, 'एआय चॅटबॉट चॅटजीपीटी'वर बंदी घालणारा इटली हा एकमेव देश नाही. यापूर्वी उत्तर कोरिया, इराण, रशिया आणि चीन या देशांनी विविध कारणे सांगून 'ओपन एआय'च्या 'एआय टूल्स'वर बंदी घातली आहे.

## मार्केट अपडेट

### 'ॲपल'च्या फोल्डेबल आयफोनची किंमत किती?



'ॲपल'चा पहिला वहिला फोल्डेबल फोन नजिकच्या काळात बाजारात येणार आहे. तो कसा असणार याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. 'ॲपल' चा हा फोन प्रीमियम कॅटगरी अंतर्गत महागड्या प्राईस टॅगसह लाँच होण्याची शक्यता आहे. 'इंडस्ट्री एनालिस्ट टीम लाँग' ने केलेल्या दाव्यानुसार फोल्डेबल आयफोनची किंमत अमेरिकेत २३०० डॉलर (सुमारे १,९१,०००) पर्यंत असण्याची शक्यता आहे. 'ॲपल'चा हा पहिला फोल्डेबल आयफोन २०२६ मध्ये बाजारात येऊ शकतो. २०२७ च्या सुरुवातीला कंपनी तो जागतिक बाजारात आणू शकते.



# आहारी जाणे टाळा

सध्या गिब्ली ट्रेंडचे वारे आहे. सगळेच हा ट्रेंड फॉलो करत या नव्या अवतारातील फोटो पोस्ट करताना दिसत आहेत. मात्र यासारख्या सोशल मिडिया ट्रेंड्सचा गैरवापरही होऊ शकतो, हे लक्षात घ्यायला हवे. विशेषत: तरुणांना त्याचे काही घातक परिणाम बघायला मिळू शकतात. कारण सोशल मिडिया एक वेगळीच, परफेक्ट जीवनाची प्रतिमा निर्माण करतो. त्यामुळे वास्तविक जीवनामध्ये ताण निर्माण होतो.

**मानसिक ताण**

गिब्ली ट्रेंडसारख्या बाबींमुळे तरुणांमध्ये मानसिक ताण वाढू शकतो. हे ट्रेंड्स लोकांना भरपूर प्रसिद्धी किंवा लाइक्स मिळवण्यासाठी धडपडायला प्रवृत्त करतात. हे लोक इतरांचे परफेक्ट जीवन पाहतात, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. सोशल मीडियावर लोक आकर्षक किंवा यशस्वी दिसत असले तरी प्रत्यक्षात तशी स्थिती असतेच असे नाही. अशावेळी इतर लोकांचे जीवन पूर्ण असून आपले अपूर्ण असल्याची भावना तरुणांचा ताण वाढवू शकते.

**ट्रेंड**

**अनावश्यक तुलना**

सोशल मीडिया कधी कधी अनावश्यक तुलना करण्यास प्रवृत्त करतं. विशेषत: गिब्लीसारख्या ट्रेंड्समध्ये लोक आपल्या व्हिडीओज किंवा पोस्टसमध्ये मोठ्या प्रमाणात गुंततात तेव्हा इतरांशी तुलना करून स्वतःला कमी समजायला लागतात.

**सोशल मिडियाच्या आहारी जाणे**

ट्रेंड्स फॉलो करण्यात अधिक वेळ घालवण्यामुळे सोशल मिडिया वापराच्या आहारी जाण्याचा धोका असतो. मुळेही मानसिक थकवा, नैराश्य आणि ताण वाढू शकतो.

**सामाजिक असुरक्षितता**

अनेकदा, गिब्ली ट्रेंड्ससारख्या गोष्टींमुळे सामाजिक पातळीवर असुरक्षितता निर्माण होऊ शकते कारण यानिमित्ताने असंख्य लोकांची वैयक्तिक माहिती, त्यांच्या कुटुंबियांचे फोटो, मित्रमंडळींसह काढलेले फोटो कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे काम करणाऱ्या कंपन्यांना सहजी उपलब्ध होतात. त्यामुळेच पुढे जाऊन त्याचा चुकीचा कारणासाठी उपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सर्व लक्षात घेता ट्रेंड्सच्या आहारी किती जायचे हे ठरवा. मुख्य म्हणजे सोशल मीडियाचा वापर सकारात्मक उद्देशांसाठी करा. मानसिक आरोग्य जपण्यासाठी काही वेळ सोशल मिडिया पासून ब्रेक घ्या. सोशल मीडियापासून प्रेरणा मिळवा मात्र इथे तुलना असू नये. इथे सक्रिय असला तरी आपल्या मार्गावर टिकून राहा. सोशल मीडिया आणि ट्रेंड्सचा योग्य वापर केल्यास ते जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतात, पण त्याचा अत्याधिक वापर मानसिक आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो, हे नेहमी लक्षात ठेवा.

# हा पर्याय समोर आहे



मी २८ वर्षांची तरुणी असून जोडीदाराच्या शोधात आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर मी खूप गोंधळून गेले आहे. मध्यंतरी माझ्या एका मित्राने लग्नाचा प्रस्ताव ठेवला. आम्ही चार वर्षांपासून एकमेकांना ओळखतो. तो खूप चांगला मुलगा आहे. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी आणि मोकळ्या विचारांचा आहे. त्याच्याशी लग्न करणं हा खरं तर खूप चांगला निर्णय असू शकतो. पण आमच्या आवडीनिवडी वेगळ्या आहेत. त्याचं व्यक्तिमत्त्व फारसं आकर्षक नाही. अनेकदा त्याच्याशी संवाद साधणंही कठीण होऊन बसतं. त्याच्याबद्दल माझ्या मनात प्रेम नाही. मी काय करू? तो सर्वार्थाने चांगला आहे म्हणून होकार देऊ की त्याच्यावर प्रेम नसल्याने नाही म्हणू?

**उत्तर :** सर्वप्रथम तू तुझ्या भावनांचं विश्लेषण कर. जोडीदारामध्ये कोणते गुण हवे आहेत याचा विचार कर. नात्यामध्ये कशाला प्राधान्य देणार आहेस, हे ठरव. एकीकडे तो खूप चांगला मुलगा आहे, त्याच्याशी लग्न करणं हा योग्य निर्णय ठरेल असं तू म्हणतेस. पण दुसरीकडे त्याचं व्यक्तिमत्त्व आकर्षक नसल्याचा आक्षेप घेते. व्यक्तिमत्त्व नंतर घडवता येतं. प्रत्येक माणसात काही चांगले तर काही वाईट गुण असतात. त्याच्यातही काही दुर्गुण असतील. तुझ्या बाबतीतही हेच म्हणता येईल. तेव्हा लग्नाचा निर्णय घेण्याआधी समुपदेशकाची मदत घेता येईल. हा पर्याय निवडून बघ. त्यानंतरच निर्णय घे.

**मॅच मेकिंग**

# ट्रेडमिलवर व्यायाम करताना...

अनेकजण जीममध्ये ट्रेडमिलवर व्यायाम करतात. मात्र ट्रेडमिल वापरताना हँडल धरावे किंवा नाही असा प्रश्न पडतो. प्रत्यक्षात ट्रेडमिलवर व्यायाम करताना हँडल धरणं योग्य नाही, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलचं हँडल फक्त आणि फक्त तुमच्या सुरक्षेसाठी असतं. त्याचा दुसरा कोणताही उपयोग नसतो. हँडल धरल्याने आपण खूप जोरात धावत आहोत, असं तुम्हाला वाटतं. पण याचा परिणाम शरीरातल्या ऊर्जेवर होतो. हँडल धरून धावल्यामुळे तुम्हाला दमल्यासारखं वाटतं. हँडल धरल्यामुळे धावणं किंवा चालण्याचे लाभ मिळत नाहीत, असंही तज्ज्ञ सांगतात.



**काळजी घ्या**

ट्रेडमिलवर व्यायाम करताना हँडल धरल्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. पहिलं म्हणजे तुम्ही खूप कमी कॅलरी खर्च करता. शरीराचं संतुलन साधू शकत नाही. शरीराची स्थिती बिघडते. हँडल धरल्यावर हातांची हालचाल होत नाही. धावताना किंवा चालताना हातांची हालचाल होणं महत्त्वाचं असतं. शरीर पुढच्या बाजूला झुकण्याच्या दृष्टीने हातांची हालचाल महत्त्वाची असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलची गती खूपच जास्त असेल तर हँडल धरल्याने तुम्ही पडू शकता. हँडल धरल्याने पायांवरचा ताण कमी होतो. पण शरीराच्या वरच्या भागावरचा ताण वाढतो. याचा परिणाम शरीराच्या खालच्या भागाच्या कार्यक्षमतेवर होतो. त्यामुळे बाहेर धावता तसंच ट्रेडमिलवर धावायला हवं.



# आग्र्याला जाताय, काय पाहाल?

जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणारा ताजमहाल पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक आग्रा येथे येतात. चांदण्या रात्री प्रेमाच्या या अद्भुत प्रतीकाचे वैभव पाहणे अनोखे आहे. अनेक पर्यटक ताजमहालला भेट दिल्यानंतर शहरातील प्रसिद्ध पेठा खरेदी करून निघून जातात. तुम्हीही आग्राला जाणार असाल तर अशी चूक करू नका कारण आग्राच्या रस्त्यांवर थोडेसे भटकला तर तुम्हाला समजेल, की इथे ताजमहालाशिवायही पाहण्यासारखे खूप काही आहे. पेठाशिवाय खायला खूप काही आहे आणि आग्राच्या आजूबाजूचा परिसरही अलौकिक आणि सुंदर आहे. त्यामुळे आग्राला जाल तेव्हा बकेट लिस्ट अशा प्रकारे बनवा की खूप आनंद आणि आठवणी घेऊनच परत याल.

**भटकंती**

✻ आग्रा किल्ला ताजमहालपासून सुमारे २.५ किलोमीटर अंतरावर आहे. तो 'युनेस्को'च्या वारसा यादीतदेखील समाविष्ट आहे. या किल्ल्यावर अनेक ऐतिहासिक आणि आश्चर्यकारक गोष्टी पाहायला मिळतील.

✻ **मेहताब बाग**: आग्राला जाऊन शांतता शोधत असाल तर यमुना नदीच्या काठावर वसलेल्या मेहताब बागला नक्की भेट द्या. इथे तुम्हाला पूर्वी कधीच अनुभवली नव्हती अशी शांतता मिळेल.

✻ **सिंकदरा**: आग्र्याला गेल्यावर सिकंदराला गेला नाहीत तर काहीतरी मिस होईल. मोगल सम्राट अकबराची कबर ताजमहालपासून १० किलोमीटर अंतरावर सिकंदरा येथे आहे. अकबराच्या जीवनाशी संबंधित अनेक ऐतिहासिक पैलू येथे पाहायला मिळतात.

✻ **इतमाद उल दौलाची कबर**: इतिहासात रस असेल तर तुम्ही ताजमहालपासून सहा किलोमीटर अंतरावर असणाऱ्या या समाधीलाही भेट देऊ शकता. ही संगमरवरी कबर कोरीव कामासाठी जगभर प्रसिद्ध आहे.

✻ **फतेहपूर सिक्री**: ताजमहालपासून फतेहपूर सिक्री ३५ किलोमीटर अंतरावर आहे. ऐतिहासिक महत्त्व आणि सुंदर वास्तुकलेसाठी पर्यटकांमध्ये या शहराची चर्चा असते.

खाद्य संस्कृतीचा स्वाद घ्या

इथे आल्यावर मुगलाई पदार्थ, बेधई आणि जिलेबी, चाट-पकोरी आणि तंजूरी पदार्थांची चव अवश्य घ्या. पेठा, संगमरवरी उत्पादने, चामड्याच्या वस्तू, हाताने विणलेले गालिचे, जरदोजी भरतकामाचे सामान आदी तुम्ही इथे खरेदी करू शकता.

**आसपास भेट देण्याची ठिकाणे**

✻ मथुरा-वृंदावन (आग्र्यापासून सुमारे ७० किलोमीटर अंतरावर)

✻ भरतपूर पक्षी अभयारण्य (सुमारे ५५ किलोमीटर अंतरावर)

✻ चंबल सफारी (सुमारे ८७ किलोमीटर अंतरावर)

✻ कीथम लेक (३४ किलोमीटर) इथे तुम्ही सूरसरोवर पक्षी अभयारण्याला भेट देऊ शकता.

दैनिक **जनता आवाज**

शुक्रवार, दि. ०५ सप्टेंबर २०२५ । अहिल्यानगर । पान नं. ८

## अवैध पेट्रोलसह डिझेल विकणाऱ्यांवर छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** वारंघुशी (ता. अकोले) येथे पेट्रोल व डिझेलचा बेकायदा साठा करून त्याची विक्री करणाऱ्या ठिकाणावर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून ६ लाख ४१ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. राहुल डोके, श्यामसुंदर जाधव,पोकॉ. मनोज साखरे, पोहेकॉ भांड यांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून वारंघुशी येथे छापा टाकला असता पांडुरंग लक्ष्मण सदगीर ( वय ४०) याच्या घरासमोर बाळगताना मिळून आला. इतरांच्या जीवितास धोका निर्माण होईल, याची जाणीव असताना देखील पेट्रोल व डिझेल विक्री करण्याकरीता प्लास्टिक ड्रममध्ये अवैधरित्या विक्रीकरीता साठविले होते. सदरचे पेट्रोल व डिझेल हे लक्ष्मण ऊर्फ पांडू तान्हाजी घोंगडे (रा. पाडळी, ता. इगतपुरी, जि. नाशिक) यांच्याकडून कमी भावामध्ये विकत घेत असल्याचे सांगितले. या कारवाईत पेट्रोल व डिझेलने भरलेले ६ प्लॅस्टिक ड्रम आणि पिकअप असा एकूण ६ लाख ४१ हजार ३७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# व्यापाऱ्यांना त्रास देणाऱ्यांचा बंदोबस्त करणार

## आमदार अमोल खताळ; व्यापारी असोशिएशनने दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेरची बाजारपेठ व्यापाऱ्यांच्या त्यागातून व कष्टातून फुलली आहे. सध्या सण उत्सवाचे दिवस सुरू आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी आपली एकजूट कायम दाखवावी. जर विनाकारण संगमनेरच्या व्यापाऱ्यांना ब्लॅकमेल करून विनाकारण कोणी त्रास देत असेल तर त्यांचाबंदोबस्त केला जाईल, असा इशारा आमदारअमोल खताळ यांनी दिला.



याविषयी माध्यमांशी बोलताना आ खताळ म्हणाले की, संगमनेर शहरातील व्यापाऱ्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची मी वेळोवेळी काळजी घेत आहे. जर संगमनेरचे व्यापारी चुकीचे वागत असेलतर त्यांच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहिजे, या मताचा मी आहे. परंतु विनाकारण जर व्यापाऱ्याला ब्लॅकमेल करून काहीजण त्रास देऊन आपल्या तुंबड्या भरण्याचे काम करत आहे. अशा अनेक तक्रारी माझ्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. मात्र जर येथून पुढील काळात जर कोणी व्यापाऱ्यांना ब्लॅकमेल करून त्रास देण्याचा प्रयत्न केला तर त्यांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा.

संगमनेर व्यापारी असोसिएशन अध्यक्ष योगेश कासट, उपाध्यक्ष सुमेध संत, सेक्रेटरी शरद गांडोळे, ओंकारनाथ भंडारी, श्री गोपाल पडतानी, ज्ञानेश्वर कर्पे, शिरीष मुळे, सुमतीलाल दरडा आदी व्यापारी उपस्थित होते.

### असे आहे हे प्रकरण

संगमनेर शहरातील मोहनलाल बन्सी लाल दरडा यांच्यामार्फत एका किरकोळ किराणा विक्री दुकानात भेसळयुक्त गुळ विक्री होत असल्याची तक्रार अहिल्यानगर येथील अन्न आणि औषध प्रशासन विभागाला केली होती. त्यानंतर औषध आणि प्रशासन विभागाचे अधिकाऱ्यांनी संगमनेरला येऊन शुद्ध नैसर्गिक गुळाची तपासणी केली. त्याचे नमुने शासकीय प्रयोगशाळेमध्ये तपासण्यात आले. त्यात सदरचा गुळ हा प्रमाणित असल्याबाबत तपासात सिद्ध झाले आहे.

# केसापुरातील हरिनाम सप्ताहाची सांगता



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आंबी :** राहुरी तालुक्यातील दक्षिणमुखी हनुमान मंदीर केसापूर येथील अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता गुरुवार रोजी गणेश महाराज शिंदे उदापूरकर यांचे सकाळी १० ते १२ काल्याचे हरिकिर्तन होऊन महाप्रसादाने झाली.

प्रारंभी रथातून दिंडी प्रदिक्षणा टाळ मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली. या वेळी अबालवृद्द भाविक उपस्थित होते. हा अखंड हरिनाम सप्ताह सराला बेटाचे महंत हभप रामगिरीजी महाराज व देवगडचे हभप भास्करगिरीजी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने वै. माधव महाराज भगत यांच्या प्रेरणेने हभप योगेश महाराज मोरगे यांच्या अधिपत्याखाली सुरु होता.

हे सप्ताहाचे १२ वे वर्षे असून सप्ताह काळात हभप कुणाल महाराज बोल्हे, ऋतुजा ताई दळवी, जालिंदर महाराज साळुंके, मनोहर महाराज जेजुरकर, किशोर महाराज जाधव, अंकुश महाराज जगताप, योगेश महाराज मोरगे यांची हरि किर्तने झाली. त्यांना गायनाची साथ शिंदे, टेकाळे महाराज यांनी तर मृदंग वादक पिसाळ, कुऱ्हे महाराज, हार्मो नियम वादक पुजारी महाराज यांनी साथ लाभली. ग्रंथराज ज्ञानेश्वरी व्यासपिठ चालक हभप कोंडीराम पेचे महाराज हे होते.

# सुवर्ण अक्षरातील 'ॐ साई राम' नावे साईचरणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत दररोज देश-विदेशातून लाखो भाविक येत असतात. आपल्या बाबांवरील अपार श्रद्धा व्यक्त करण्यासाठी अनेक साईभक्त विविध प्रकारचे दान अर्पण करतात. अशाच एका श्रद्धावान साईभक्ताने, बाबांच्या चरणी सुवर्ण अक्षरात 'ॐ साई राम' अशी दोन नावे अर्पण करण्याची मनोमन इच्छा अखेर पूर्ण केली.



या भक्ताने तब्बल १६०० ग्रॅमपेक्षा अधिक वजनाची व किंमत रु. १ कोटी ५८ लाख ५० हजार ९८९ इतकी मौल्यवान असलेली दोन सुवर्ण 'ॐ साई राम' अक्षरे श्री साईबाबांच्या चरणी अर्पण केली. भक्ताच्या इच्छेनुसार त्यांचे नाव गुप्त ठेवण्यात आले आहे.

ही सुवर्ण अक्षरे संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांच्याकडे भावपूर्वक सुपूर्त करण्यात आली. त्यानंतर ही अक्षरे श्री साई समाधी मंदिरात प्रतिष्ठित करण्यात आली असून ती सर्व भाविकांचे लक्ष वेधून घेत आहेत. या अनमोल दानाबद्दल संस्थानच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गाडिलकर यांनी संबंधित साईभक्तांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

सुवर्णाक्षरातील 'ॐ साई राम' हे नक्षीकामाने अलंकृत झालेले असून श्रद्धा, भक्ती आणि दानशीलतेचा संगम असलेले हे अक्षर भक्तांच्या हृदयाला भावणारे ठरत आहे.

# जायकवाडीच्या तीरावर पडला मृत माशांचा खच

## पाण्याच्या किनारी मृत चिलापी; कारण स्पष्ट होईना; पर्यावरणप्रेमींमधून चिंता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पैठण :** येथील जायकवाडी धरणाच्या पाण्यातील चिलापी प्रजातीचे मृत मासे गेल्या दोन दिवसांपासून तीरावर दिसून येत आहे. मृत माशांचा खच पाहून पर्यावरणप्रेमींमधून चिंता व्यक्त केली जात आहे.



यावर्षी जायकवाडी धरण शंभर टक्के भरत आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून जायकवाडी धरण परिसरातील पंप हाऊसजवळ पाण्याच्या किनारी मृत चिलापी मासे दिसून येत असल्याचे पर्यावरणप्रेमींमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

याबाबत मच्छीमार संघटनेचे अध्यक्ष बजरंग लिंभोरे म्हणाले, जायकवाडी धरणात पाणी वाढत असून, पाण्यात बदल होतो. यात नदी, ओढे, नाल्याचे पाणी सध्या धरणात येत आहे. यामुळे माशांना इजा पोहोचते. तसेच चिलापी माशांचा पिल्ले देण्याचा सध्या हंगाम आहे. त्यामुळे काही मासे मृत पावतात, ते तीरावर येतात.

गेल्या दोन दिवसांपासून जायकवाडीत पंप हाऊसजवळ पाण्याच्या किनारी मृत चिलापी मासे दिसून येत आहेत.

### मत्स्यव्यवसाय विभागाने केला पंचनामा

सध्या उपलब्ध असलेल्या माहितीवरून, पाण्यातील ऑक्सिजनची कमतरता, पाणी शुद्धतेतील बदल किंवा इतर नैसर्गिक कारणे, यामुळे मासे मरू शकतात, अशी माहिती जाणकरांनी दिली, मात्र अधिकृत तपासणीचे याबाबतचे निष्कर्ष अद्याप आलेले नाहीत. मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृत माशाचे पंचनामे केले.

# चोरी करणाऱ्या टोळीचा म्होरक्या गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** राहुरी पोलीस ठाणे हद्दीतील देवळाली प्रवरा परिसरात घातक शस्त्रांनिशी जबरी चोरी करणाऱ्या टोळीचा प्रमुख सूत्रधार कैलास रामू धोत्रे (रा. देवळाली प्रवरा) याला राहुरी पोलिसांनी अटक केली आहे. सदर गुन्हा घडून गेल्यानंतर तो दीर्घकाळ फरार होता. अखेर २ सप्टेंबर रोजी गोपनीय माहितीच्या आधारे त्याला देवळाली प्रवरा येथून शिताफीने ताब्यात घेण्यात आले.



या प्रकरणात देवळाली प्रवरा येथील शेतकरी शंकर नारायण देशमुख यांच्या वाड्यावर काही चोरट्यांनी दरोड्याच्या तयारीने येऊन दोन बकऱ्या चोरून नेल्या होत्या. सदर चोरटे बकऱ्या घेऊन जात असताना राहुरी फॅक्टरी परिसरातील सतर्क नागरिकांनी त्यांना थांबवले. त्यावेळी एक आरोपी सनी उर्फ कृष्णा मुकेश सूर्यवंशी यास नागरिकांनी पकडून थेट पोलिसांच्या हवाली केले. मात्र त्याचे इतर चार साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले होते.

### छापा रचून केले गजाआड

या प्रकरणात यापूर्वी विशाल उर्फ पिण्या विष्णू बर्डे, दादा राजू बर्डे आणि अनिल दत्तू पवार या आरोपींना अटक झाली होती. परंतु गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार असलेला कैलास धोत्रे फरार होता. अखेर तो गावात परत आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव यांना मिळाल्यानंतर त्यांनी पोहेकॉ. राहुल यादव आणि पोकॉ. गणेश लिपणे यांच्या पथकासह कारवाई करत आरोपीस ताब्यात घेतले. त्याला न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली आहे.

# आनंदगड संकुलामध्ये आरोग्य तपासणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट विरगावच्या आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज आणि मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयात रोटरी क्लब अकोले सेन्ट्रल, ग्रामीण रुग्णालय, अकोले, अकोले हॉस्पिटल आणि आनंदगड शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये १५४ विद्यार्थ्यांची सिबीसी तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.



यावेळी डॉ.प्रकाश वाकचौरे, धनराज भरसट यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयी मार्गदर्शन करण्यात आले. तर पंचायत समितीचे माजी सदस्य अरुण शेळके यांनी या आरोग्य शिबिराचे कौतुक केले.

या शिबिराचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते. यावेळी ग्रामीण रुग्णालय डॉ. बाळासाहेब मेहेत्रे, अमोल देशमुख, सचिन देशमुख, विजय पावसे, डॉ. प्रकाश वाकचौरे, सिद्धेश वाकचौरे, भरसट, महेश वलवे, कदम, किशोर वलवे, अरुण शेळके आदी उपस्थित होते.

# सुवर्णयुग मंडळाचे कार्य प्रेरणादायी

## जिल्हाधिकारी डॉ. आशिया; श्री गणेशाची केली आरती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा जागृत करणाऱ्या सुवर्णयुग तरुण मंडळाचे कार्य कौतुकास्पद असून, इतर मंडळांसाठी हा एक आदर्श आहे, असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी काढले. सामाजिक बांधिलकी जोपासत गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांनी समाजात सकारात्मक बदल घडवावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

पाथर्डी येथील राज्यस्तरीय द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळवणाऱ्या सुवर्णयुग तरुण मंडळाच्या गणेशमूर्तीचे दर्शन घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते श्रीगणेशाची आरती करण्यात आली. या प्रसंगी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, किशोर सानप, उत्सव समितीचे अध्यक्ष गोपालसिंग शेखावत, वैभव शेवाळे, उमेश रासने, डॉ. अभय भंडारी, दिगंबर जोजरे,गणेश बाहेती, अनिल खाटेर, हरिसिंग राजपुरोहित, सुखदेव देवासी, बंडू दानापुरे, योगेश घोडके, मोहन यादव, शैलेंद्र दहिफळे, मोनीश उदबत्ते, ओम डागा, दत्ता पंडित, आशा जोजारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# जीएसटी निर्णयाचे विवेक कोल्हेंकडून स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीच्या धोरणातून व केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जीएसटी परिषदेत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जीएसटीतील १२ व २८ टक्के स्लॅब रद्द करून फक्त ५ व १८ टक्के हेच स्लॅब ठेवण्यात आले आहेत. या ऐतिहासिक निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार आहे.



या निर्णयाचे स्वागत करताना कोल्हे साखर कारखान्याचे अध्यक्ष व युवानेते विवेक कोल्हे म्हणाले की, सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आलेला हा निर्णय सर्वांसाठी आनंददायक ठरणार आहे. दैनंदिन वापराच्या वस्तूंवरील करकपातेमुळे महागाईवर नियंत्रण येईल आणि कुटुंबांचा आर्थिक ताण हलका होईल. किराणा सामान, कपडे, घरगुती उपकरणे यावरचा करकपात सर्वसामान्यांना थेट दिलासा देणार आहे.

### कृषी क्षेत्राला फायदा होणार

सरकारने कृषी क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे. आता ट्रॅक्टरचे टायर आणि सुट्या भागांवरील जीएसटी कमी करण्यात आला आहे. आता ट्रॅक्टरवर खरेदीवर १२ ऐवजी फक्त ५ टक्के कर आकारला जाईल. तसेच बयो-पेस्टीसाईड्स जैव-कीटकनाशके, माइक्रोन्यूट्रिएंट्स, ड्रिप इरिगेशन सिस्टम (ठिबक सिंचन प्रणाली) आणि आधुनिक कृषी यंत्रसामग्री देखील आता ५ टक्के कर स्लॅबमध्ये आणण्यात आल्या आहेत. यामुळे शेतीचा खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांना थेट फायदा होईल.

# रस्त्याप्रश्नी रास्ता रोकोचा इशारा

## कृती समितीने दिले प्रशासनाला निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** नगर-मनमाड रस्त्याच्या दुरुस्तीचे काम संथगतीने सुरू असून राहुरी परिसरात आठवडाभरात ४ निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला आहे. संतप्त झालेल्या कृती समितीने १० सप्टेंबर रोजी राहुरी फॅक्टरी येथे रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



नगर- मनमाड रस्ता दुरुस्ती कृती समितीच्या वतीने तहसीलदार नामदेव पाटील आणि पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना यासंदर्भात लेखी निवेदन देण्यात आले. नगर ते कोपरगाव मार्गाचे पूर्ण डांबरीकरण करून पेव्हमेंट स्वरूपात तयार करणे,देवळाली नगरपरिषद हद्दीतील साईड गटार भूमिगत करणे, भविष्यातील सर्व्हिस रोड लक्षात घेऊन सध्याचे भूमिगत ट्रेनिंगचे नियोजन करावे, सुरू असलेल्या रस्त्याच्या कामांची माहिती फ्लेक्स बोर्डवर जनतेसाठी जाहीर करणे,रस्ता डांबरीकरण न झाल्यास जड वाहतुकीस बंदी घालून पर्यायी मार्गाने वळविणे आदिंसह विविध मागण्या करण्यात आल्या आहे.

यावेळी कृती समितीचे वसंत कदम, अनिल येवले, देवेंद्र लांबे, प्रशांत मुसमाडे, आदिनाथ कराळे, बाळासाहेब लोखंडे, दत्ता गागरे, प्रशांत काळे, कांता तनपुरे, प्रतीक तनपुरे आदी उपस्थित होते.

# शारदीय नवरात्रोत्सवासाठी मोहटादेवी गडावर तयारी

## जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी गडावरील कामांची केली पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** राज्यातील सर्वात मोठ्या यात्रांपैकी एक मानली जाणारी शारदीय नवरात्रोत्सव यात्रा काही दिवसांवर येऊन ठेपली असताना जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी मोहटादेवी गडावर येऊन विविध कामांची पाहणी केली. यात्रेदरम्यान भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी घाट रस्ता, पाणी, वीजपुरवठा, दळणवळण सुविधा व अतिक्रमण हटविण्याबाबत संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले.



जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच गडावर दाखल झालेल्या आशिया यांनी देवीची महापूजा केली.विश्वस्त डॉ. श्रीधर देशमुख, देवस्थान समितीच्या वतीने जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांनी स्वागत करून यात्रे संबंधितली माहिती दिली. यावेळी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राहुल कांबळे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे उपस्थित होते.

यात्रेपूर्वी घाट रस्त्याचे काम १५ सप्टेंबरपर्यंत पूर्ण व्हावे आणि पायी चालत येणाऱ्या तसेच वाहनाने येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी अतिक्रमणे त्वरित हटविण्यात यावीत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी तहसील प्रशासनाला दिले.

### उत्सवकाळात अखंड वीज द्यावी

वीजपुरवठा खंडित होण्याच्या तक्रारींवरून वीज वितरण कंपनीला अहोरात्र अखंड वीजपुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. नवरात्र कालावधीत मोहटादेवी गडावर लाखो भाविक हजेरी लावतात. त्यामुळे भाविक हाच केंद्रबिंदू मानून सर्व प्रशासकीय विभागांनी समन्वयाने कामे पार पाडावीत, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. यात्रेपूर्वी पुन्हा एकदा पूर्वतयारीची पाहणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11